# माणूस

२४ नोव्हेंबर १९७३
पन्नास पैसे

या
अंकापासून



संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२४ नोव्हेंबर १९७३

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : सव्वीसावा

## सप्रेम नमस्कार...

**१७ नोव्हेंबर, ७३**

◘ आजच्या अंकातील 'बुवा सामंत' हा माझा लेख वाचला. पण लेखावर लेखकाचे नाव का नाही ?

हिंचगिरीचा महादेवाप्पा देवरू लेखही फारच बोलका आहे. छान लिहिला गेला आहे. अत्यंत प्रामाणिक जीवन व्यतीत करणाऱ्यांचे हे जग नाही, तरीही आपण असे लेख प्रसिद्ध करून आपल्या संपादकीय कर्तृत्वाचा उत्कृष्ट परिचय देत आहात.

सारखी वृत्तपत्रांतून अगदी संपादकीय म्हणून लिहिले जाणारे टीकालेखही वैयक्तिक निंदानालस्ती व व्यक्तिगत द्वेषाने बरबटलेले आढळतात. त्याची कारणेही परिचितांना माहीत असतात. कुणा संपादकाचे धागे कुठे गुंतलेले आहेत हे सामान्य जनतेला कळणे कठीण असते.

लो. टिळक, आगरकर, अच्युतराव कोल्हटकर किंवा अलीकडच्या काळातील श्री. शं. नवरे यांचा अपवाद वगळता संपादकीय खुर्चीला मान्यता देणारे, तिचा आब राखणारे संपादक महाराष्ट्रात किती आहेत हा संशोधनाचा विषय होईल. निरपेक्ष वृत्तीने लिहिलेले लेखही केवळ याच पूर्वग्रहीत दृष्टीमुळे प्रसिद्ध केले जात नाहीत.

'बुवा सामंत' यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मृत्यूचे भांडवल करून धंदा करणारेही लोक या जगात आहेत. नामनिर्देश करणे व्यवहारवादाला धरून होणार नाही.

**गजानन जोहारी**, गोरेगाव (मुंबई)

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मानवत टोळीला अटक का नाही ?

निळू दामले

मागील काही 'माणूस 'च्या अंकातून वन्सी वाळकेला पकडण्याचा तमाशा मोडकांनी कसा केला तेव्हापर्यंतची हकीकत मी दिली आहे. बन्सीला पकडल्यानंतर सप्टेंबरच्या शेवटल्या आठवड्यात ४ थ्या खुनातील पंचनाम्यातले एक पंच श्री. संतराम लाड यांचा मृत्यू झाला. हातपाय बांधून पडलेल्या अवस्थेत एका विहिरीत तो आढळून आला. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी ती आत्महत्या असल्याचे सांगितले. एक वरिष्ठ अधिकारी चौवळ यांना मी विचारले की संतरामची आत्महत्या होती याला निर्णायक पुरावा आपणाकडे आहे काय ? उत्तर न देता त्यांनी ती आत्महत्याच असल्याचे सांगितले आणि गेल्या आठवड्यात मानवतला गेलो असताना आता तो खून असल्याची नोंद 'वरून ' दबाव आल्यामुळे करण्यात आली असल्याचे समजले आहे. हा काय प्रकार आहे ? पोलीस अधिकारी पहिल्यापासूनच असे उलटे सुलटे का वागत आहेत ? संतराम लाड हा केवळ पंच नव्हता. पोलिसांना तपास करताना एका शेतकऱ्याच्या कुऱ्हाडीवर रक्ताचे डाग सापडले होते. ज्या शेतकऱ्याच्या कुऱ्हाडीवर डाग सापडले त्या शेतकऱ्याशी हा संतराम संबंधित होता. संबंध काय होते ? मी कशाला उगाच सांगू ? पोलिसांनीच ते जाहीर करावे.

संतरामच्या घरच्या लोकांना भेटल्यावर त्यांचा सूर आणखीनच काही वेगळा होता. पोलिसांनी त्याला खूप इंगा दाखवल्याची तक्रार माझ्या कानावर आली.

आता म्हणे संतरामच्या खुनाचाही तलास चालू आहे.

या नंतरच ८ ऑक्टोबरला पार्वतीबाईचा खून आंबेगाव रस्त्यावर झाला. ३० वर्षाची ही गरीब बाई. गावाच्या टोकाला हिचं घर आहे. तीन मुले आहेत.

६ व्या खुनानंतर मोठ्या प्रमाणावर पोलीस अधिकारी मानवतात मुक्काम ठोकून होते. दोन श्वान पथके होती. गुप्तचर विभागाचे नाणावलेले अधिकारी मुक्काम ठोकून होते. ४।५ जीप्स व दोन पोलीस व्हॅन्स तळ ठोकून होत्या. मानवतला लष्करी छावणीचे स्वरूप आले होते.

◻

संशयित म्हणून पकडले गेलेले उत्तमराव बारहाते वस्तुतः हजेरीसाठी

परभणीला हजर असायला हवे होते. पण तेही मानवतलाच होते.

सुप्रसिद्ध फौजदार परांजेही त्याच-वेळी मानवतला हजर होते. (कारण विचारले तर उत्तर काय? त्यांच्या पत्नीला क्षयरोग आहे व ट्रिटमेंटसाठी त्यांना मानवतला यावे लागते. मानवतला हॉस्पिटलही नाही. मग जादूगार मॅंड्रेक इथे त्यांना ट्रिटमेंट देतो काय ?)

अशा परिस्थितीत दि. ८ रोजी संध्याकाळी पार्वतीबाई शेतातून परत न आल्याची बातमी पोलीस ठाण्यात पोचली. पोलीस हादरले. आंबेगाव रस्त्यावर शोधाशोधीला सुरुवात झाली. त्याच दिवशी रात्री पोलिसांच्या कुत्र्यांना पार्वतीबाईने ठेवलेले राळ्यांचे बोचके आणि मोळी सापडली. पण त्या बोचक्यापासून काही पावले अंतरावर असलेले पार्वतीबाईचे प्रेत सापडायला मात्र दुसऱ्या दिवशीचे दुपारचे ४ वाजले! असे का झाले? आणि प्रेतही प्रथम सापडले ते मदतीला धावलेल्या स्थानिक पत्रकारांना, पोलिसांना नाहीच.

पार्वतीबाई बारहातेचा हा खून ८ तारखेला संध्याकाळी ५॥ वाजताच्या सुमारास झाला होता.

प्रेत मी पाहिले त्यावेळी ते फार भयानक अवस्थेत होतं. दोन दिवस माझ्या घशाखाली घास उतरु शकला नाही. पार्वतीबाईच्या शरीराची विटंबना करण्यात आली होती.

मोळी आणि बोचके अत्यंत व्यवस्थित होते. तेथे झटापटीच्या खुणा नव्हत्या. पार्वतीच्या हातातल्या बांगड्या जशाच्या तशा होत्या.

प्रेत सापडले हायब्रीड ज्वारीच्या शेतात. अत्यंत अलगदपणे उचलून ठेवल्यागत दिसत होते. आसपासची ज्वारीची ताटे जशीच्या तशीच होती. मोडली नव्हती की वाकली नव्हती. जिथे प्रेत मिळाले तेथेही झटापटीच्या कोणत्याही खुणा आढळून आल्या नाहीत.

पार्वतीबाईचा डावा डोळा काढून नेण्यात आला होता. खुनाची जागा आहे पांढरीच्या मारुतीला लागून. याच मारुतीजवळ गुप्त धन आहे अशी अफवा आहे. याच मारुतीजवळ ४ थ्या दुर्दैवी मुलीचे हरवलेलं शीर आहे असे बन्सी वाळकेने सांगितले होते.

पोलिसांना आव्हान देऊनच खून झाल्यासारखा प्रकार!

बारहातेला पकडल्यानंतर ६ वा खून! वाळकेला पकडल्यावर ७ वा खून!

मला झटकन फोनवर मोडक-साहेबांशी झालेली बातचीत आठवली. ही खुन्यांची टोळी आहे हे मान्य करायलाच मोडक तयार नव्हते. आता मात्र त्यांना पाथरी येथे छेडल्यावर त्यांनी कबूल केले की, ही एक टोळी असली पाहिजे.

पार्वतीबाईच्या खुनावरून पुन: जुन्या निष्कर्षांना उजाळा येतो. झटापट नाही याचा अर्थ खून करणारा तिच्या चांगल्या माहितीतला म्हणजेच मानवत

पृष्ठ ४० वर

# मुक्ताफळे

## ☐ अंगावरती शहारे

नोटा छापणे हा भारतातील आजचा सर्वात मोठा किफायतशीर धंदा आहे. संपूर्ण राष्ट्रियीकरण झालेले असूनही उत्तम स्थितीत चाललेला हा एकमेव उद्योग होय. सरकारी क्षेत्रात असूनही तोटा नसणारा धंदा म्हणून या धंद्याकडे बोट दाखवता येईल. भारतभर ज्या मालाला उठाव आहे, अशा या उद्योगात महाराष्ट्राचा वाटा सिंहाचा आहे. नाशिकरोड येथे 'इंडिया सिक्युरिटी प्रेस' या ठिकाणी तर एकपासून शंभराच्या नोटा छापल्या जातात.

देशातील बेकार तरुणांना या धंद्याविषयी कुतुहल असणे साहजिकच आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी खेड्यापाड्यातून सर्वांना सरकारी नोकऱ्या देण्याची एक धाडसी योजना 'काम-हमी-योजना' कागदोपत्री आखली होती. या योजनेला लागणारा पैसा केंद्राकडून आणण्याचा त्यांचा विचार होता. परंतु प्लॅनिंग कमिशनने या योजनेला पुसले नाही. म्हणजे फक्त पाने पुसली! यामुळे नाईकांना जसे वाईट वाटले, त्याचप्रमाणे खेड्यापाड्यात तरुणांतही वैफल्य पसरले असले पाहिजे.

खेड्यातील एका तरुणाने नुकतीच नासिकच्या 'सिक्युरिटी प्रेस'ला भेट दिली. कडेकोट बंदोबस्त असूनही हा इसम आत गेला. या तरुणाचे नाव उत्तम रावजी सोदे. औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्याच्या बोरगावचा हा राहणारा. ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी हे विचाऱ्याच्या लक्षात आले नाही. चौक्यामागून चौक्या पार करीत हा तरुण थेट शंभराच्या नोटा छापतात त्या मशीनपुढे गेला. नोटा छापण्याचाच धंदा खेडोपाडी काढायचा तर रुपया-दोन रुपयाच्या नोटा छापण्यात अर्थ काय ? गोडेतेल देखील आठ रुपये किलो ! म्हणून शंभराची नोट कशी छापतात याचा बारकाई तो अभ्यास करू लागला. तिथल्या सुपरवायझरने त्याला हटकले. एकाग्रचित्ताने कामाकडे पाहणारा माणूस सरकारी कारखान्यात सहसा दिसत नाही ! यामुळे सुपरवायझरला संशय आला. त्याने त्याला पोलिसांच्या हवाली केले.

पोलिसांनी श्री. सोदे यांची चौकशी केली. तो खेडुत आहे आणि त्याला श्रीरामपूरला जायचे आहे यापलिकडे काही निष्पन्न होईना. पोलिसांनी त्याला सोडून दिले.

शेवटी प्रश्न उरला – हा खेडू

इसम आतपर्यंत गेला कसा? हा प्रश्न आम्हाला मुळीच विकट वाटत नाही. काय बरे झाले असावे?

पहिल्या गेटावर त्याला पहारेकऱ्याने हटकले. विचारले–

'कोण रे तू?'

श्री. सोदे म्हणाले–

'जरा नीट बोला की! यशवंतरावांना सांगितले तर उद्या घरी पाठवीन–'

पहारेकरी वरमला. त्याला वाटलं हा यशवंतराव चव्हाणांचा कोणीतरी जवळचा दिसतोय! जाऊ द्या पुढे.

दुसऱ्या गेटावर दुसरा पहारेकरी आडवा आला.

'एऽऽ आत कुठे चालला?

'वसंतदादांचा चुलतभाऊ इथं असतो नव्हं? त्यो आमच्या मेव्हण्याचा सख्खा साडू–'

पहारेकरी मा. वसंतदादाकरवी आपले काय काम होऊ शकेल याच्या विचारात गुरफटला. सोदे तिसऱ्या चौकीपाशी. सरकारी कचेऱ्यांच्या, कारखान्यांच्या चौक्या सर करण्याचा मंत्र श्री. सोदे यांना पाठ असावा. बाळासाहेबांचा पाहुणा, दादांचा मेव्हणा करीत आत घुसणे हे तंत्र जगजाहीर असताना पोलिसांना 'सोदे आत कसा गेला?' हा प्रश्न का बरे पडावा.?

आम्ही म्हणतो, काही का असेना, उत्तम रावजी सोदे हे सिक्युरिटी प्रेसच्या अखेर बाहेर तरी आले. परंतु लायकी नसताना, साहेब-दादांच्या परोक्ष-अपरोक्ष मदतीने जे सोदे सरकारी कचेऱ्यात कायमचे घुसले आहेत, ते कधी बाहेर येतील का? एक उत्तम सोदे बाहेर आला, परंतु लघुत्तम सोद्यांचे काय?

सरकारी कुशीमधी
बीयबियानं निजली
वर पसरला मंत्री
जशी शॉल पांघरली
बीय टरारे भूमीत,
सर्व कोंब आले वऱ्हे
गहिवरले शेत जसे
अंगावरती शहारे ॥

□

## □ लखनवी नाच

'अंतरंग' या 'महाराष्ट्र टाईम्स' मधील साप्ताहिक सदरात श्री. मो. ग. रांगणेकर यांनी आचार्य-चुकलो, भगवान रजनीशांच्या एका टेप रेकॉर्ड होणाऱ्या कार्यक्रमाचे सुंदर वर्णन केले आहे. वरळीवर असलेल्या एका स्टुडियोत अनेक स्त्री-पुरुष डोळे मिटून दोन्ही हात पसरून एका लयीत नाचत होते. आराम खुर्चीवर बसून भगवान त्या सर्वांना कसे नाचवीत होते याचे श्री. रांगणेकरांनी केलेले वर्णन वाचताना, आम्हाला उत्तर प्रदेशच्या दौऱ्यात आम्ही नुकत्याच पाहिलेल्या एका अशाच दृश्याची तीव्रतेने आठवण होत होती.

लखनौच्या एका विस्तीर्ण सभागृहात सुमारे तीन साडेतीनशे स्त्री पुरुष डोळे मिटून दोन्ही हात पसरून एका लयीत नाचत होते. जवळच्या टेपरेकॉर्डवरून 'खुर्ची-खुर्ची' ही लय वाजवण्यात येत

होती. सर्व माणसे संपूर्ण खादीधारी, बऱ्याच जणांची पोटे सुटलेली, काहींची धोतरे सुटत चाललेली म्हणजे वस्त्राचे भान सुटलेली अशी पन्नाशीच्या आसपासची. एक माणूस फक्त खादीधारी लंगोट नेसून नाचत होता. तो तरुण तुर्क आहे असे कळले. अंगात आलेल्या माणसासारखे सर्व घुमत होते. भिंतीवर इंदिरादेवीचे भव्य छायाचित्र होते. एका आराम खुर्चीवर आचार्य शंकर दयाळ शर्मा पहुडले होते. त्यांनी मध्येच टेप रेकॉर्ड थांबवून घोड्याला चुचकारावे तसे सर्वांना चुचकारले. त्यांनी सर्वांना एक आवाज काढायला सांगितला. मग सर्वजण 'त्रिपाठी त्रिपाठी' असा आवाज करीत नाचू लागले. टेप रेकॉर्डची लय वाढवण्यात आली. आ. शंकर दयाळ मध्येच 'कमलापती' म्हणत की सर्वजण 'त्रिपाठी त्रिपाठी' असे मोठमोठ्याने उड्या मारीत आवाज करीत. मग आचार्यांनी सर्वांना डोळे मिटून जमिनीवर उताणे पडा म्हणून सांगितले. आचार्यांनी विचारलं 'तुम्हाला आता किती शांत वाटते?' त्याबरोबर सगळ्यांनी दोन्ही हात बाजूला हापटीत— 'अहाहा अहाहा' असा शांतिदायक घोष करायला सुरुवात केली.

ह्या घोष चालू असतानाच, आचार्य आरामखुर्चीवरून उठले. त्यांनी आलेला फोन घेतला. फोन देवीजींचा होता. मग आचार्य म्हणाले— 'उठा—उठा—नाचा'.

सर्वजण नाचू लागले. लय वाढवण्यात आली. आचार्य म्हणाले 'बहुगुणा बहुगुणा' पाहता पाहता सर्वांनी नवी लय पकडली. पुन्हा सर्व बेहोश होऊ लागले. आचार्य म्हणायचे— 'हेमवती नंदना—नंदना—' सर्व मंडळी कल्लोळ करायची. 'बहुगुणा बहुगुणा'

आचार्य रजनीशांच्या जिमनॅशियम पेक्षा, देवी इंदिराबाईंचा 'जिमनॅशियम' फार मोठे कार्य करीत आहे असे आम्हास वाटते. या कार्याने केसरी पत्राचे संपादक श्री. जयंतराव टिळक देखील प्रभावीत झाले. त्यांनी देवीजींची माळ घातली, तिथे सामान्यांची काय कथा? भगवान रजनीशांना महाराष्ट्रात जसे श्री. गोपीनाथ तळवलकर लाभले, तसे देवीजींना आता श्री. जयंतराव टिळक लाभले आहेत. श्री. जयंतरावांनाही केंद्रिय मंत्रीपद, परराष्ट्रातील ॲम्बेसडरशिप आणि शेवटी गव्हर्नरशिप लाभावी अशी आमची सदिच्छा व्यक्त करून आम्ही त्यांना झटपट यश चिंतितो!

—ग्यानबा

## सोलकढी

# तेंडुलकरांचा विजय

गेली कित्येक वर्षे, मराठी रंगभूमीला उदार आश्रय देणाऱ्या जबाबदार आणि सोशिक प्रेक्षकाची भूमिका मी इमानेइतबारे करतो आहे. कर देणाऱ्या रंगभूमीवरील नाटके मी पाहिली आहेत. कर माफ झाल्यामुळे जेव्हा तिकिटांचे दर वाढले तेव्हाही माझे नाटक पाहणे चालूच आहे. आणि आता पुन्हा कर भरण्याचा प्रसंग आला तरी माझे इमान ढळणार नाही. थोडक्यात आणि सूत्ररूपाने सांगायचे झाल्यास असे सांगता येईल की आजची मराठी रंगभूमी माझ्या उघडया डोळयादेखत घडली आहे. तेंडुलकरांच्या विजयचे 'श्रीमंत' मी पाहिले आहे; आणि विजय तेंडुलकरांचे 'घाशीराम कोतवाल' मीच बंद पाडले आहे.

म्हणजे गेली १५–२० वर्षे तेंडुलकर आपले सारखी नाटके लिहून राहिले आहेत. आणि आम्हाला ती पहायला भाग पाडत आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत तेंडुलकरांची नाटके पाहायला सावध मराठी प्रेक्षक गर्दी करत नसे. आता परिस्थिती पार बदलली आहे. आता सावध मराठी प्रेक्षक तेंडुलकरांचे नाटक पाहायला वा ते बंद पाडायला उत्स्फूर्तपणे गर्दी करतो. हे भाग्य मराठीतील दुसऱ्या कोणत्याही नाटककाराच्या वाटयाला आले नाही; त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही मराठी नाटककाराच्या दृष्टीने तेंडुलकर हा एक सामान्य नाटककार ठरला आहे.

तेंडुलकरांच्या नाटकांनी एकीकडे मराठी प्रेक्षकांना हलवले आणि दुसरीकडे एका पाठोपाठ एक सन्मान प्राप्त केले. १९७० साली त्यांच्या 'शांतता ! कोर्ट चालू आहे' या नाटकाला भारतीय नाटय संघाचे पारितोषिक मिळाले. या नाटकाचे सर्व भारतीय भाषातून अनुवाद झाले. १९७१ साली संगीत नाटक अकादमीचा बहुमान तेंडूलकरांना लाभला. आणि आता, जवाहरलाल नेहरू शिष्यवृत्ती त्यांनी पटकावली आहे. तेंडुलकरांचा हा विजय नगण्य नव्हे ! या शिष्यवृत्तीतून तेंडूलकरांना किती हज्जार रुपये मिळणार याचा बारीक हिशेब माझ्या प्रिय वाचकांनी तत्परतेने केव्हाच करून टाकला असेल; म्हणून तो मी करत नाही. 'हिंसाचार आणि त्याचा समकालीन रंगभूमीवरील कथानकांवर झालेला परिणाम' या विषयाचे संशोधन करण्याकरता तेंडुलकरांना ही शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.

तेंडुलकर... या नव्या बहुमानामुळे माझ्यासारख्या कट्टर अपक्ष रसिकाची परिस्थि... मोठी चमत्कारिक होऊन बसली आहे : तेंडूलकरांचे मनमोकळे अभिनंदन करायचे म्हटले तर तेंडूलकर–निर्मूलन–समितीचे भय वाटते. ही समिती, मराठी रंगभूमीवर कर नको तसा तेंडुल'कर' नको, असा आक्रोश करत असते. बरे, तेंडुलकरांच्या या बहुमानाकडे मनमोकळे दुर्लक्ष करायचे म्हटले तर स्वतःच्याच मनाचे भय वाटते. त्या मराठी मनाला ब्याण्णव हज्जाराचा विसर पडणे जरा अवघडच नव्हे काय ? —अनंतराव

# इंदिराजींच्या पावलावर

## गयाराम

देशात पेट्रोलची टंचाई निर्माण झाली आणि त्याचे भावही वाढले. पण त्यामुळे जेवढी खळबळ माजली नसेल त्यापेक्षा अधिक खळबळ इंदिराजींच्या 'बग्गी' प्रकरणामुळे उडाली. चांगले कुणाला बघवत नाही हेच खरे ! लगेच कुणाच्या तरी पोटात दुखू लागते. आता पेट्रोल वाचविण्यासाठी इंदिराजी एक दिवस बग्गीतून सचिवालयात गेल्या. पुढेमागे सुरक्षा अधिकाऱ्यांच्या दोन-तीन मोटारी आणि मध्ये पंतप्रधानांची बग्गी. ज्या दिल्लीकरांना हे नयनमनोहर दृश्य प्रत्यक्ष पाहायला सापडले असेल ते धन्य होत. विरोधकांनी उगीचच कोल्हेकुई केली नसती तर माताजी रोजच अशा बग्गीतून गेल्या असत्या आणि कितीतरी पेट्रोल वाचले असते. दिल्लीकरांनाही माताजींचे रोज अनायासे दर्शन घडले असते ! पण तो योग नव्हता. त्यांनी केले एका हेतूने आणि झाले भलतेच ! हे विरोधक शिचे भारी कुत्सित. जनसंघाचे श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी तर कहर करून टाकला. ते संसदेच्या अधिवेशनाला बैलगाडीत बसून आले. जनसंघाचे इतर खासदार तर सायकलीवर बसूनच संसद-भवनाच्या परिसरात दाखल झाले ! इंदिराजींच्या सद्भावनेचा हा किती विपर्यास ! पण विरोधकांचा हा चावटपणा जनता ओळखीत नाही असे थोडेच आहे ! इंदिराजींना आणि नवकाँग्रेसला बदनाम करणे हा विरोधकांचा धंदाच आहे. आमच्या मनावर तरी या बैल-गाडी–सायकल स्टंटचा मुळीच परिणाम झालेला नाही. पेट्रोल वाचविण्यासाठी इंदिराजींनी ही जी बग्गी किंवा व्हिक्टोरिया मोहीम सुरू केली आहे ती तशीच पुढे रेटली पाहिजे. म्हणजे मग इतर पुढाऱ्यांनाही या गोष्टीपासून स्फूर्ती घेता येईल आणि पेट्रोल वाच-विण्यासाठी त्यांनाही आपापले नवे वाहन निवडता येईल.

आम्ही हा विचार आमचे मित्र आमच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष बाळाप्पा धसमुसळे यांना बोलून दाखविला तेव्हा ते म्हणाले,

'आम्ही इंद्रानिष्ठ पुढारी आहोत. इंद्राजी जसे करतील तसेच आम्ही पण करणार. त्या म्हणाल्या की, पेट्रोल

पृष्ठ ४६ वर

# मशीद जेव्हा हलवली जाते !

मुकुन्द मणूरकर

'संभाजी पूल दर्गा हलवा, अन्यथा परिणामास तयार व्हा ' अशा पाट्या पुण्यात ठिकठिकाणी लागल्या होत्या. त्याच्या आधी युवक महामंडळ व हिंदू तरुण मंडळ यांची सभा होऊन निर्वाणीचा इशारा दिला गेला होता. दुसऱ्या दिवशी पोलीस कमिशनरांच्या कचेरीवर संतप्त तरुणांचा मोर्चा गेला होता. त्याच्या एक दोन दिवस आधी मिर्झा बेग या मुस्लिम लीगच्या नेत्याने 'याद राखा मशिदीला हात लावाल तर...' अशा तऱ्हेचा दम दिला होता. दरम्यानच्या काळात पूर्वभागात हिंदु-मुस्लिम गुंडात खाजगी वैमनस्यावरून भोसकाभोसकीचे प्रकार चालू होते व त्यात एका मुस्लिम तरुणाचा बळीही गेला होता.

नुकतीच मे महिन्यात पुण्यात जातीय दंगल झाली होती. दंगलीच्या आधी ज्या ज्या घटना घडल्या होत्या त्याच्याशी मिळत्या जुळत्या अशाच घटना आताही घडत होत्या. त्या दंगलीची पुनरावृत्ती होणार की काय हा गेल्या महिनाभरातील चर्चिला जाणारा प्रश्न. बरेचसे होकारार्थी उत्तर अपेक्षित असलेला हा प्रश्न परवा एकदम निकालात निघाला तो मात्र अनपेक्षितपणे. म्हणजे अपेक्षित अशा अनपेक्षितपणे ! बारा तारखेच्या सर्व वर्तमानपत्रात चक्क बातमी– ' मशीद हलवली. विश्वस्तांनी स्वतःहून मशीद हलवली. वगैरे वगैरे ..'

संबधितांनी आणि संबंधित नसलेल्यांनीही सुस्कारा सोडला.

□

संभाजी पूल म्हणजेच लकडीपूल, कर्वेरोडला जिथे मिळतो, त्या कोपऱ्यात नदीच्या बाजूला ही मशीद होती. मशीद म्हणजे दोन-तीन तट्टे उभारून केलेला आडोसा. ही जागा महानगरपालिकेच्या रस्तारुंदी प्रकल्पामध्ये जात होती. परंतु महानगरपालिकेला या जागेचा ताबा मिळत नव्हता. महानगरपालिकेच्या मते ही जागा महानगरपालिकेच्याच मालकीची आहे. येथे मशीद वगैरे काहीही नव्हते. मग काय होते ?

टाऊन प्लॅनिंग अॅक्ट, स्कीम नं. १ मध्ये सिटी सर्व्हे नं. ७४४ म्हणून नोंद असलेला भाग म्हणजेच ही वादग्रस्त जागा. मूळची ही जागा ६७०५ चौ. फूट होती व १८४९ पासून कबरस्तान म्हणूनही वापर होई. १९३० मध्ये हे कबरस्तान टाऊन प्लॅनिंग अॅक्ट अन्वये नेमलेल्या आर्बिट्रेटरने (लवाद) महानगरपालिकेच्या स्वाधीन केले. टाऊन प्लॅनिंग अॅक्टप्रमाणे आर्बिट्रेटरला कुठल्याही स्मशानभूमी बंद करून जागा

ताब्यात घेण्याचे अधिकार दिले आहेत. तर ही जागा महापालिकेच्या ताब्यात देताना त्यांनी अट घातली, की जागेभोवती कुंपण घालावे व सॅनिटरी कंडीशनमध्ये ती ठेवावी. ही जागा महापालिकेच्या मालकीची अशा रितीने होत असताना कुणालाही नुकसान भरपाई देण्यात आली नाही. हे कबरस्तान बंद झाल्यावर तिथे एक पीर उभारला गेला. कर्वे रस्त्यावर, सध्या जिथे आयलंड असून पोलीस उभा रहातो तिथे एक पीर होता. त्रेपन्नसाली स. गो. बर्वे कमिशनर असताना, भाऊसाहेब शिरोळे, गणपतराव नलावडे वगैरे मंडळींनी तो रातोरात उखडला. त्यावेळी रस्तारुंदीसाठी एकंदर ४५६१ चौ. फूट जागा घेण्यात आली. त्यातून उरलेली जागा म्हणजे सध्याची वादग्रस्त जागा.

या जागेवर मशीद होती अशी नोंद कुठल्याही रेकॉर्डमध्ये– सिटी सर्व्हे किंवा टाऊन प्लॅनिंगमध्ये नाही. परंतु महानगरपालिकेचा जो नाव नंबरचा तक्ता असतो त्यात मात्र मशीद म्हणून नोंद आहे. ही नोद कशी झाली ? तर कुणीतरी एक मुसलमान कारकून त्या खात्यात होता. त्याने ही मशीद म्हणून नोंद केली. करामध्ये सूट मिळावी हाच त्याचा यात हेतू होता ! चार खण जागा मशीद म्हणून त्यावेळी नोंद झाली. मशिदीचे बांधकाम नव्हतेच ! नंतर काही मुस्लिमांनी चॅरिटी कमिशनरकडे अर्ज केला. येथे मशीद होती. आम्ही तिचे विश्वस्त आहोत. वगैरे वगैरे. आणि त्यानंतर तिथे तीन शेड्स उभारल्या गेल्या. पानशेतच्या पुरापूर्वी नकाशावर ज्या तीन शेड्स दिसतात, तीच ही मशीद !

पानशेतच्या पुरात सर्व शेड्स वाहून गेल्या. त्यानंतर आता जे बांधकाम उभारले गेले होते ते परवानगी न घेता ! पुरात नुकसान झालेल्या देवस्थानांना सरकारने मदत देऊ केली होती. या मशिदीसाठी विश्वस्तांना तीन हजार रुपये मदत मिळाली. व मग कॉर्पोरेशनकडे बांधकामासाठी परवानगी मागितली होती. या संबंधात एक जी. आर. आहे. त्या अन्वये महापालिकेच्या हद्दीत देऊळ, मशीद किंवा चर्च बांधायचे झाल्यास त्याला कलेक्टरचे 'नो ऑब्जेक्शन' सर्टिफिकेट लागते. त्यावेळी महम्मद देशमूख हे मुस्लिम कलेक्टर होते. त्यांनी चार नागरिकांची सभा घेऊन विचारणा केली की या मशिदीला कुणाची हरकत आहे का ? तर कुणीही हरकत घेतली नाही. त्याचवेळी देशमूख साहेबांच्या मनात विचार आला की आपण मुस्लिम, आपणच जर नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट दिले तर लोकांचा गैरसमज व्हायचा. म्हणून त्यांनी डेप्युटी कलेक्टरला 'नो ऑब्जेक्शन'वर सही करावयास लावली. कायद्याप्रमाणे हे सर्टिफिकेट फक्त कलेक्टरचा हुद्दा असलेल्या व्यक्तीसच देता येते. म्हणजे हेही बेकायदेशीर ठरले.

मशीद प्रकरणाचा पूर्वेतिहास तो हा असा !

¤

ही जागा महानगरपालिकेच्या रस्ता

रुंदीच्या प्लॅनमध्ये येत होती. म्हणजे संपूर्ण जागा नाही, तर जागेचा काही भाग. आवश्यक तो भाग महापालिकेच्या ताब्यात देण्याची विश्वस्तांची तयारी होती. पण उरलेल्या जागेत मशीद बांधण्यास परवानगी द्यावी ही त्यांची मागणी. महापालिकेची अर्थातच याला तयारी नव्हती. यातून नाईक कमिशनचा घोळ घातला गेला.

खरे तर या प्रकरणात अशा तऱ्हेच्या कमिशनची गरज मुळीच नव्हती. कारण कमिशनचा निर्णय कायदेशीररीत्या कुणावरच बंधनकारक नसतो. महापालिकेतर्फे असे सांगण्यात आले, की हे कमिशन नेमताना त्याचे निर्णय दोन्ही पक्षांवर बंधनकारक रहातील असे दोन्ही पक्षांकडून ठरले होते. पण आता मशिदीचे विश्वस्त म्हणतात तसे काही ठरलेच नव्हते. 'असे जर काही आम्ही मान्य केले असते तर आमच्या लोकांनी बोंब मारली असती ना' —एका ट्रस्टीचे हे उद्गार. असे होते तर मग हे लोक कमिशनपुढे आपली बाजू घेऊन गेलेच कशाला? तर आपल्या बाजूने निर्णय लागेल ही खात्री होती म्हणून!

अखेर नाईक कमिशनने निर्णय महानगरपालिकेच्या बाजूनेच दिला. बांधकाम बेकायदेशीर आहे हे सांगितलेच, पण पूर्वी येथे मशीद नव्हती, ही जागा महापालिकेच्या मालकीची आहे हेही सांगितले.

या निर्णयावर मग विश्वस्तांनी सिव्हिल कोर्टात अपील करून बांधकाम पाडण्यास मनाई हुकूम मिळविला. तसेच महापालिकेवर दावाही लावला.

मुजुमदार कोर्टाने नाईकांच्या निर्णयाचा अर्धा भाग मान्य केला. म्हणजे पानशेत पुरानंतरचे बांधकाम बेकायदेशीर आहे. पण जागेची मालकी मशिदीच्या विश्वस्तांचीच आहे असा निकाल दिला. अर्थात् महानगरपालिकेने त्यावर हायकोर्टात अपील केले!

¤

२९ नोव्हेंबर १९७२ रोजी मुजुमदार साहेबांनी निकाल दिला. जागेच्या मालकीसंबंधी नक्की ठरायचे असले तरी जागेवरील बांधकाम बेकायदेशीर ठरले होते. हे बांधकाम पाडण्यास महानगरपालिकेला कोणताच प्रत्यवाय नव्हता. तशी तयारीही झाली. इतक्यात कुठूनतरी कळ फिरली. आणि बांधकाम पाडण्यास निघालेला महापालिकेचा ताफा माघारी फिरला. त्याचवेळी शिवसेनेने एक मोर्चा नेला. आणि तेव्हापासून मशिदीपाशी पोलीसपहारा बसला. तो अगदी परवा परवा बांधकाम पाडीपर्यंत होता!

गमतीची गोष्ट म्हणजे मशिदीच्या विश्वस्तांचा, बेकायदेशीर ठरलेला भाग पाडण्यास विरोध नव्हता महापालिकेचीही बांधकाम पाडण्याची तयारी होती. फक्त आडकाठी होती ती मुस्लिम मतदारांची मते आपल्या पारड्यातून निघून जातील ही सनातन भीती असलेल्या काही काँग्रेस धेंडांची व त्याला साथ होती काही समाजवादी साथींची!

याचवेळी मुख्यमंत्र्यांनी एक समिती

नेमली. मशिदीलाही पर्यायी जागा शोधण्याचे काम या समितीकडे होते. मोहन धारिया, शिवाजीराव ढेरे व निळूभाऊ लिमये हे तिचे सभासद. त्यांनी जागेचा शोध सुरू केला. यातील मोहन धारिया सर्वांत उत्साही. काही काँग्रेस नगरपित्यांना हाताशी धरून जागेची पाहणीही त्यांनी सुरू केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्या भागातून, म्हणजे पुलाच्या वाडीतून निवडून आलेले काँग्रेसचेच श्रीकांत शिरोळे यांना काही धारियांनी सल्लामसलतीसाठी घेतले नाही. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. समितीने बऱ्याच प्रयत्नांनी शोधून काढलेली जागा निघाली ती एका हिंदू देवस्थानाच्या मालकीची ! आता धारियाप्रभृती समितीतील सभासद म्हणत असले की, ही जागा देवस्थानाच्या मालकीची आहे याची आम्हाला कल्पना नव्हती, तरी काही लोक असे म्हणतात की, या समितीने ही जागा जाणूनबुजूनच पुढे केली. हेतू हा की, यावर वादंग माजून प्रश्न लोंबकळत रहावा. तर निळूभाऊ लिमये खाजगीत म्हणायचे की, या जागेचे नंतर पहाता येईल, आधी संभाजी पुलापासून तरी मशीद उठू द्या! ◻

या पर्यायी जागेच्या प्रकरणाने मात्र या प्रश्नाला एकदम चालना मिळाली. तसा शिवसेनेच्या मोर्चाच्या घोषणांनी हा प्रश्न जागता ठेवला होताच. मध्यंतरी शिवसेनेचा कुदळ-फावडी घेऊन मोर्चा निघणार होता. पण सुरवातीलाच शनिवार वाड्यावर पोलिसांनी हस्तक्षेप करून तो बारगळलवला. पण पर्यायी जागा देण्याचे नक्की झाल्यापासून या प्रकरणाला चांगलीच प्रसिद्धी मिळू लागली. बेकायदेशीर बांधकामाला पर्यायी जागा द्यायची आणि तीही भर हिंदू वस्तीत, हिंदू देवस्थानाच्या मालकीची ! संतप्त होण्यास एवढी गोष्ट पुरेशी होती. याचवेळी स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीकांत शिरोळेंनी जाहीर करून टाकले, की मी अध्यक्ष असेपर्यंत बेकायदेशीर बांधकामाला एक इंचही जागा देणार नाही! शिरोळचांच्या या घोषणेने धारिया वगैरेंची भरपूर पंचाईत करून टाकली.

एव्हाना या प्रकरणात शिवसेनेबरोबरच हिंदू तरुण मडळ व युवक महामंडळ उतरले. यांची एक संयुक्त सभा झाली. त्यात काका वडके, बिंदुमाधव जोशी, प्राणनाथ कपूर, ग. वा. बेहेरे आदींची भाषणे झाली. भाषणे अतिशय जोरदार झाली. सभेला पाच-सहा हजार श्रोते उपस्थित होते. त्याच वेळेला दुसऱ्या दिवशी पोलीस कमिशनरच्या कचेरीवर मोर्चा न्यायचे ठरले. तसा तो गेलाही. आणि मोर्चा परतताना ज्या गोष्टी घडणे क्रमप्राप्त असते तशा दोन-चार ठिकाणी घडल्याही !

या मोर्चाबरोबरच सनदशीर आंदोलनाची समाप्ती झाल्याचे युवक महामंडळाच्या पुढाऱ्यांनी जाहीर केले. पाच-सहा दिवसात आम्ही ती मशीद उडवून लावू असेही त्यांनी सांगितले.

प्रकरणाचा शेवट जवळ आला होता. प्रश्न दिल्लीतही जाऊन पोचला होता. असे म्हणतात, की एक महत्त्वाची मिटींग दिल्लीत असतानाही बाईंनी धारियांना पुण्यात पाठविले. नऊ तारखेला धारिया आले आणि त्यांनी रात्री मशिदींच्या विश्वस्तांची व जबाबदार मुस्लिमांची बैठक घेतली व सरळ त्यांना सांगितले म्हणे, तुम्ही जर आता हे बांधकाम हलविले नाही तर पुण्यात कधीही दंगल होऊ शकेल आणि त्यावेळी आम्ही (कॉंग्रेस) तुमच्यामागे रहाणार नाही हे लक्षात ठेवा. तेव्हा काय ते ठरवा. विश्वस्तांनी बांधकाम हलविण्याचे मान्य केले. दुसऱ्या दिवशी कौन्सिल हॉलमध्ये सर्व पक्षीय निमंत्रितांची बैठक होती. त्यात धारियांनी विश्वस्तांना विनंती करावयाची व विश्वस्तांनी ती मान्य करावयाची असे ठरले. त्याप्रमाणे झालेही !

अर्थात् मशिदीच्या विश्वस्तांनी मात्र असे काही घडले नसल्याचे सांगितले. पण कौन्सिल हॉलवरील एका प्रसंगावर नजर टाकल्यास यातील खरेपणा दिसून येतो. त्या सभेत सर्वकाही ठरल्यावर जनसंघाच्या रामभाऊ म्हाळगींनी आठ दिवसाच्या मुदतीची मागणी केली. त्यावेळी धारियावरोबर त्यांचा खटकाही उडाला. यावेळी शिवसेनेचे काका वडके किंवा बिंदुमाधव जोशी अगदी गप्प बसून होते. याचे कारण उघड आहे. त्यांना माहित होते की एकदोन दिवसातच ही मशीद पाडली जाणार आहे. तसे (ठरलेले) नसते तर प्रथमपासून हा प्रश्न धसास लावणाऱ्या काका वडके प्रभृतींनी म्हाळगींच्या मागणीला नक्कीच पाठिंबा दिला असता !

अखेर ठरल्याप्रमाणे अकरा तारखेला रात्री विश्वसांनी स्वतः होऊन बांधकाम पाडून टाकले व या प्रकरणावर तात्पुरता का होईना, पण पडदा टाकला.

◻

दुसऱ्या दिवशी हिंदु तरुण मंडळ, युवक महामंडळ यांच्यातर्फे एक आभारप्रदर्शनाची सभा. या सभेत आभारही मानले गेले आणि अभिनंदनही केले गेले. पोलीस कमिशनर, मशिदीचे विश्वस्त यांचे पुनः पुनः आभार मानले जात होते. यातील विशेष म्हणजे मोहन धारियांचे मुक्तपणे केले गेलेले अभिनंदन !

धारियाचे अभिनंदन कशाकरता असे काका वडक्यांना विचारल्यावर ते आधी नुसते हसले. पण मग म्हणाले, ' धारियांनी त्या दिवशी का होईना, पण खरोखर चांगले कार्य केले. विश्व-

---


**पूर्णिया**

**अनिल अवचट**

**सहा रुपये**

**राजहंस प्रकाशन**


---

स्तांना तडकाफडकी बांधकाम हलवायला त्यांनीच लावले.

'म्हणजे शेवटी हा धारियांचा विजय ठरणार तर...'

'छे, छे, हा विजय युवकशक्तीचा. धारियांनी आता जे काही केले ते पूर्वीही करता आले असते. पण त्यांनी नाही केले. आता मात्र केले, कारण या प्रश्नाभोवती जमा झालेली युवकशक्ती. एकदिलाने सर्वजण गोळा झाल्यामुळे धारियांना हा निर्णय घ्यावा लागला आणि विश्वस्तानाही!'

¤

काका वडकेंच्या मते हा युवाशक्तीचा विजय तर ॲडव्होकेट एस. ए. रहेमान यांच्या मते हा लोकशाहीचा खून आहे. ॲड. रहेमान हे या प्रकरणातील विश्वस्तांचे वकील. जबरदस्त प्रॅक्टीस. पानशेत प्रलय व दोन जातीय दंगली असे एकूण तीनदा सर्वस्व धुवून गेल्यावरही पुनः सर्व वैभवाने उभे केले. अशिलांपैकी पंच्चाण्णव टक्के हिंदू.

'या प्रकरण.बद्दल एका वाक्यात सांगायचे झाल्यास बहुसंख्यांकांनी अल्पसंख्याकांवर बहुमताच्या जोरावर केलेला अत्याचार! ही मशीद म्हणून याला असा न्याय? या मशिदीवरून एकदा तरी दंगल उडाल्याचे उदाहरण आहे का? बांधकाम बेकायदेशीर होत हे मला मान्य, पण इतरही अशी अनेक बेकायदा बांधकाम आहेत. जिजामाता बागेसमोर, शनिवारवाड्याला लागून गणपतीचे मंदिर उभारले आहे. तेही बेकायदा बांधकामच आहे. मग त्याबद्दल काही उपाययोजना नाही का?...असं मी काही बोललो की अगदी कॉंग्रेस हाऊसमध्येही मला जातीयवादी म्हणून समजतात.'

¤

ए. आर. शेख हे मशिदीच्या विश्वस्तांपैकी एक. भयंकर बिझी माणूस. सर्वकाही तोंडपाठ आहे, तुम्हाला पाच मिनिटात मोकळे करतो असे म्हणून उभ्याउभ्याच बोलायला सुरुवात.

'हे बांधकाम तुम्ही आपणहून पाडले तेव्हा काही दडपण आले का?'

'काही नाही.'—शेख.

'मग आताच हा निर्णय का घेतलात?'

'कारण शहरात एक टेंपो निर्माण झाला होता. उगीच काही दंगल वगैरे व्हायला नको म्हणून आम्ही हा निर्णय घेतला. शिवाय कॉर्पोरेशने येऊन पाडण्यापेक्षा आम्ही आपणहून पाडणे हे चांगले!

'बरं मग, आता पुढे, काही पर्यायी जागेची मागणी वगैरे?'

'ते बघू. सध्या आम्ही आहे त्या ठिकाणीच प्रार्थना करतो. सध्या पाऊस वगैरे नाही, त्यामुळे शेड्सची काही विशेष आवश्यकता नाही..'

¤

टीकेविना: या प्रकरणात अखिल भारतीय पक्षापैकी जनसंघ मधूनमधून (फक्त) पत्रक काढीत होता. समाजवादी पक्ष तेही करीत नव्हता.

● ● ●

# अजब तुझे सरकार !

सु. ल. सोमण

विधान सभा, वगैरे सभागृहांतून विरोधी किंवा कधी सरकार पक्षाचेही आमदार व सरकारतर्फे मंत्री ह्यांच्यात प्रश्नोत्तरांच्या नेहेमीच फैरी झडतात. ह्या सर्वच प्रश्नोत्तरांना वृत्त-पत्रांतून संपूर्ण प्रसिद्धी कधीच मिळत नाही. अशा प्रसिद्धी न मिळालेल्यात काही मासलेवाईक प्रश्नोत्तरंही असतात. त्यात सार्वजनिक महत्त्वाची अशीही माहिती बरीच असते. अशी माहिती बहुधा दडूनच राहते. अशा काही प्रश्नोत्तरांना खुद्द सरकारी पुस्तकांतूनच उद्धृत करून द्यायचा हा प्रयत्न !

## मुंबई आमदार निवास भाड्याची थकबाकी

प्रश्न : वर्ध्याचे आ. श्री. व. ज. कार्लेकर (तारांकित प्रश्न क्र. १५५८८ दि. १–८–७३).

१. मुंबईतील आमदार निवासाच्या भाड्या-पोटी आमदार व्यक्तींकडून दि. ३१ मार्च, १९७३ पर्यंत येणे असलेल्या रकमेपैकी किती रक्कम आतापर्यंत वसूल करण्यात आली ?

२. अद्याप किती रक्कम बाकी आहे व ती वसूल करण्यासाठी काय कारवाई होत आहे ?

उत्तर : इमारती व दळणवळण मंत्री श्री. अंतुले :

१. मुंबईतील आमदार निवासाच्या भाड्यापोटी आमदार व इतर व्यक्तीं-कडून दि. ३१ मार्च, १९७३ पर्यंत एकूण रु. ५३,६९५·९८ इतकी रक्कम येणे होती. त्यापैकी रु. ६,९१७·७५ वसूल करण्यात आले आहेत.

२. अद्यापपर्यंत रु. ४६,७७८·२३ इतकी रक्कम वसूल व्हावयाची बाकी आहे. ती रक्कम वसूल करण्यासाठी संबंधीत सन्माननीय सदस्यांना वारंवार पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.

–यथा राजा तथा प्रजा ह्या न्यायाने आपल्या सन्माननीय प्रतिनिधींचा कित्ता

सामान्य जनतेने गिरवायचा ठरवला तर काय होईल ? थोडा विचार करण्याजोगा मुद्दा आहे. नाही ? ●

## खेड्यातला वीज पुरवठा – एक मासला !

प्रश्न : आ. अर्जुनराव वानखेडे (मलकापूर) व आ. कृ. धों. भेगडे (मावळ).

(प्रश्न क्रमांक १५६७७ दि. १–८–७३).

१. मौजे सवदड तालुका मेहेकर, जिल्हा बुलढाणा येथील शेतकऱ्यांनी वीज मंडळाकडे वीज मिळण्याकरिता अनेक वेळा अर्ज केलेले असूनही अद्यापही त्यांना वीजपुरवठा झालेला नाही हे खरे का ?

२. असल्यास, त्याची थोडक्यात कारणे काय आहेत ?

३. त्यांना त्वरित वीजपुरवठा म्हणून काय कारवाई होत आहे व तो त्यांना केव्हा करण्यात येईल ?

उत्तर: वीज पुरवठा मंत्री श्री. तिडके :

१. उक्त गावातील शेतकऱ्यांनी ऑगस्ट, १९७२ मध्ये वीजपुरवठ्यासाठी अर्ज केलेले असून त्यांना अद्याप वीज पुरवठा झालेला नाही.

२. या गावाला वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्याने त्याला मंजुरी देण शक्य झाले नाही.

३. बुलढाणा जिल्ह्यातील गावाच्या विद्युतीकरणाच्या मे १९७३ मध्ये ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाला पाठविण्यात आलेल्या योजनेत या गावाचा अंतर्भाव केलेला आहे. ती योजना मंजूर झाल्यावर उक्त गावाचे विद्युतीकरण करण्यात येईल.

–सर्वांच्या विरोधात जाऊन बॅक बे रेक्लेमेशन, जुळी मुंबई वगैरे अवाढव्य खर्चांच्या योजना केवळ बहुजन हितायच (!) शासन राबवीत असता विदर्भातल्या सवदड नामक फुटकळ गावासाठी वीजपुरवठा करायला पैसा शिल्लक नसणार हे वास्तविक आमदार द्वयांच्या ध्यानी आधीच आलं असणार. पण तरी आपले फुक्कट प्रश्न विचारतात. ह्या समाजवादी लोकशाहीत आमदारांना (विशेषत: विरोधी आमदारांना !) काही ताळतंत्रच नाही. फिरवली जीभ, विचारला प्रश्न ! समाजवादाचं, बहुजन समाजाच्या कल्याणाचं कंकण बांधलेल्या मंत्र्यांची मात्र त्यामुळे फार चमत्कारिक अवस्था होते. बिच्चारे ! ! ●

## कोकण बोट वाहतूक आणि भाडेवाढ

प्रश्न : आमदार त्र्यं. सी. कारखानीस, कोल्हापूर व आमदार फ्रे. मी. पिंटो, माहीम मुंबई.

(प्रश्न क्रमांक १५१७३. १ ऑगस्ट, १९७३).

१. चौगुले कंपनीच्या कोकण लाईनवर प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींच्या भाड्यात २० टक्क्यांनी वाढ होणार आहे अथवा झाली आहे हे खरे काय?

२. या दरवाढीसंबंधी महाराष्ट्र सरकारची प्रतिक्रिया काय?

३. सदरील भाडेवाढीमुळे कोकणच्या जनतेत असंतोष पसरला आहे हे खरे आहे काय व असल्यास ही भाडेवाढ होऊ नये म्हणून ह्या शासनाने काय प्रयत्न केले?

उत्तर : इमारती व दळणवळण खात्याचेमंत्री बॅ. अंतुले.

१. अद्यापी भाडेवाढ झालेली नाही. तथापी ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारातील असून त्याच्या विचाराधीन आहे.

२. ही भाडेवाढ करू नये असे राज्य शासनाचे मत आहे.

३. भाडेवाढ होणार अशा प्रकारच्या वृत्तपत्रातील बातम्यामुळे जनतेत असंतोष पसरला आहे, तेव्हा ही भाडेवाढ करू नये असे राज्य शासनाने केंद्र शासनास कळविले आहे व भाडेवाढ ह्या प्रश्नावरील कायमचा तोडगा होऊ शकत नसल्याने शिपींग कॉर्पोरेशनने ही सर्व्हिस आपल्या सर्वसामान्य व्यवहारातील एक असे कल्पून नफा वा तोटा सोसावा, अशी सूचना मुख्य मंत्र्यांशी झालेल्या चर्चेत केली आहे.

कोकण बोट वाहतूकीचे अखेर राष्ट्रियीकरण, राष्ट्रपतींचा वटहुकूम जारी!... मुख्यमंत्री श्री. नाईक व दळणवळण मंत्री श्री. अंतुले ह्यांनी भारत सरकारचे अभिनंदन केले! (लोकसत्ता : ८-११-७३)

कोकणच्या बोटी आठवड्यात सुरू पण भाडे चाळीस टक्के अधिक!... कोकण बोट वाहतूक ताब्यात घेतल्याबद्दल विविध राजकीय पक्षांनी व उतारू संघटनांनी समाधान व्यक्त केले असले तरी भाडेवाढीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली आहे!!

(लोकसत्ता : ९-११-७३)

'चाळीस टक्के भाववाढ मान्य केली असली तरी ती वाढत्या खर्चाच्या मानाने फार अपुरी आहे.' इति श्री. श्रीवास्तव, अध्यक्ष भारतीय शिपींग कॉर्पोरेशन.

## पोलीस चौक्यांसाठी मुंबईत जागा उपलब्ध नाहीत!

प्रश्न : आमदार श्री. रिझान हॅरिस, भिवंडी; आमदार श्री. रा. का. म्हाळगी, शुक्रवार पुणे; आमदार श्री. प्रमोद नवलकर, गिरगाव, मुंबई.

(प्रश्न क्रमांक १४९४४. दि. ७-८-७३.)

तारांकित प्रश्न क्रमांक ८४४१ ला दि. १५-२-७३ रोजी दिलेल्या उत्तरांच्या संदर्भात सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय?

१. बृहन्मुंबईत जादा पोलीस चौक्या

(ठाणी) उघडण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

२. अद्यापी निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय व निर्णय केव्हा-पर्यंत घेतला जाण्याची शक्यता आहे ?

उत्तर : मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक.

१. पोलीस ठाणी उघडण्यासाठी व पोलीस अधिकारी व शिपाई यांचे निवासस्थानासाठी लागणारी जागा उपलब्ध नाही हे विलंबाचे प्रमुख कारण आहे. योग्य त्या जागा व पैसे उपलब्ध होणे ह्यावर अंतिम निर्णय अवलंबून राहील.

एका अधिकृत अंदाजाप्रमाणे बृह-न्मुंबईत निवासस्थानांच्या, जागांच्या व्यवहारावर दररोज कोटयवधी रुप-यांची उलाढाल चालू असते आणि एवढं असूनही पोलीस टाण्यासाठी, पोलि-सांच्या निवासासाठी जागा उपलब्ध होऊ नयेत ह्यासारखा खात्याचा दैव-दुर्विलास कोणता असावा !

'बॅक वे रेक्लेमेशन ही योजना शासन राबवीलच, कारण ती सोन्याचं अंडे देणारी कोंबडी आहे, असं एका मंत्र्यांनी महापालिकेच्या शिष्टमंडळास सांगितल्याचे समजते' (एक बातमी लोकसत्ता. ९-११-७३) तेव्हा आता पोलीस चौक्यासाठी आवश्यक तो पैसा उपलब्ध होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही तर ?

• • •


यंदाचे महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचें एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

# जोती – सावित्रा

**श्रीपाद केळकर**

स्वतः सासरा आपल्या जावयाला सांगतो आहे, 'माझी मुलगी तुम्ही केलीत. पण तिला संतती होत नाही. तुम्ही खुशाल दुसरं लग्न करा. माझी मुळीच हरकत नाही.'

या सासऱ्याचे नाव आहे झगडे-पाटील आणि जावयाचे नाव आहे जोतीराव फुले. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे.

वयाची पस्तीशी आली. सावित्राशी लग्न होऊन वीस-बावीस वर्षे झाली तरी जोतीरावांना संतती झाली नाही. त्यांच्या वडिलांचाही सारखा धोशा होता की, दुसरं लग्न कर. परंतु सासऱ्याचे किंवा वडिलांचे काही केल्या जोतीराव ऐकत नव्हते. तरीदेखील दोघांचा आग्रह चालूच राहिला.

अखेर एक दिवस जोतीरावांनी गंभीरपणाने सांगून टाकले, 'ठीक आहे. मी करीन दुसरं लग्न. पण एक अट आहे. तुम्ही सावित्रालाही मी हयात असतानाच दुसरं लग्न करण्याची परवानगी दिली पाहिजे. तिलाही मूल हवं आहे.'

सासरा आणि वडील दोन्ही अवाक् झाले.

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील ही गोष्ट आहे. आज विसाव्या शतकात, अगदी १९७३ मध्येही आपल्या पत्नीला संततीसाठी दुसरा विवाह करण्यास सांगणारा पती मिळणार नाही.

जोतीरावांचे हे उत्तर म्हणजे आग्रही वडिलांना व सासऱ्याला निरुत्तर करण्याचा प्रयत्न नव्हता किंवा निव्वळ थट्टा नव्हती. नर-नारी समतेविषयींची त्यांची भूमिका त्या उत्तरात सामावलेली होती. एकोणीसाव्या शतकात आणि आज विसाव्या शतकात स्त्री-पुरुष समानतेचा घोष केलेले व करणारे अनेक समाजसुधारक होऊन गेले आणि आहेतही. पण हा सिद्धांत या मर्यादेपर्यंत मानणारे व आपल्या व्यक्तिगत जीवनात त्याला स्थान देणारे समाजसुधारक क्वचितच झाले असतील. मात्र अलीकडच्या काळातील एक उदाहरण आठवते. सेनापती बापटांचे. आपल्या खडतर राजकीय जीवनामुळे आपण पतिकर्तव्ये पार पाडू शकत नाही म्हणून

सेनापतींनी आपल्या मित्राकरवी आपल्या पत्नीला दुसरा विवाह करण्याचा आग्रह केला होता.

सतीप्रथेला विरोध करताना जोतीरावांनी असाच प्रश्न केला होता. 'पती गेल्यावर पत्नी स्वखुशीने किंवा नाइलाजाने सती जाते. परंतु आपली पत्नी मेल्यावर कोणी 'सता' झाला आहे काय? उलट तो आणखी एका सुकुमार युवतीला घरात आणतो आणि भोगलालसा पुरी करतो.'

पुरुषांच्या विवाहस्वातंत्र्याच्या बाबतीतील विशेषाधिकारालाही जोतीरावांचा विरोध होता. बहुपत्नित्वाला त्यांनी जबरदस्त विरोध केला. त्यांनी पुरुषजातीला प्रश्न केला, 'पत्नी जिवंत असतानाही तुम्ही आपल्या सुखोपभोगासाठी तिची 'सवत' घरी आणता. तुमच्या पत्नीने 'सवता' आणायचे ठरविले तर काय होईल?'

सतीची व बहुपत्नित्वाची प्रथा केवळ अमानुष नाही तर ती स्त्री-पुरुष समानतेच्या देखील विरोधी आहे अशी जोतीरावांची ठाम धारणा होती. पतीहून वेगळे असे स्त्रीचे अस्तित्व हिंदुसमाजाने कधीच मानलेले नाही. सती प्रथा हे याचे उदाहरण आहे. पतीबरोबर आपल्या जीवनाचा अंत करण्याची या प्रथेत एक सक्ती आहे.

सती व बहुपत्नी प्रथेला विरोध करणारे जोतीराव हेच एकमेव सुधारक होते अशातला भाग नाही. एकोणीसाव्या शतकात देशातील अनेक सुधारकाग्रणींनी या प्रथांना विरोध केला होता. परंतु त्यामागे स्त्री-पुरुष समानतेची प्रेरणा होती असे ठामपणे म्हणता येत नाही. तर त्या विरोधामागे एक प्रकारची स्थूल दया भावना व पुरुषानुकूल अशी नैतिकता काम करीत होती. या दृष्टीने जोतीराव हे त्यांच्या काळातील सुधारक नेत्यांपेक्षा किती तरी क्रांतिकारी होते असे म्हणावे लागेल.

जोतीराव शूद्र होते. एका ब्रह्मणेतर समाजात (माळी) त्यांचा जन्म झाला. त्यामुळेच नर-नारी समानतेचा क्रांतिकारी विचार ग्रहण करण्याची क्षमता त्यांच्या अंतःकरणात व बुद्धीत होती असे म्हणता येईल काय? निश्चित सांगता येत नाही. पण एक गोष्ट निश्चित. शहरी व शूद्रेतर समाजापेक्षा ग्रामीण व शूद्र समाजातील स्त्री व पुरुष एकमेकांशी अधिक बरोबरीने आणि अनौपचारिक पद्धतीने वागतात, बोलतात.

आजच्या हिशेबाने जोतीराव फक्त एस्. एस्. सी. पास होते. विश्वविद्यालयीन आधुनिक शिक्षणाचा त्यांना स्पर्शही झालेला नव्हता. आधुनिक पाश्चिमात्य शिक्षणाचे व विद्येचे आगमन महाराष्ट्रात जोतीरावांचे शिक्षण संपल्यानंतर बारा-तेरा वर्षांनी झाले. अशा परिस्थितीत स्त्री-पुरुष समानतेचा आधुनिक पाश्चिमात्य विचार जोतीरावांनी ग्रहण केला याचा विस्मय वाटतो.

जोतीरावांच्या स्त्रीविषयक समतावादी उदार दृष्टीकोणाचे मूळ त्यांच्या

चातुर्वर्ण्यविरोधात सापडते. ते कट्टर ब्राह्मण्यविरोधी होते. ब्राह्मण वर्गाने शूद्रातिशूद्रांच्या पंक्तीला स्त्रीलाही नेऊन बसविले. त्यांना विद्येची दारे बंद केली. विश्‍वळ एक उपभोगाची, हीन वस्तु बनविली. साऱ्या जीवनभर जोतीराव याविरूद्ध लढले. किंबहुना त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभच मुळी स्त्री-शिक्षणाच्या प्रचाराने केला. १८५१ साली जोतीरावांनी पुण्याच्या बुधवारपेठेतल्या ऐन ब्राह्मण वस्तीत मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्यात ब्राह्मण मुलीच प्रामुख्याने प्रारंभी होत्या. पुण्यात एका शूद्राने ब्राह्मण व अन्य मुलींसाठी प्रथम शाळा काढावी ही विलक्षण गोष्ट होती.

जाती व वर्ग यांच्यापलीकडे जाऊन स्त्रियांच्या मुक्तीसाठी जोतीराव झगडले. विधवाविवाहासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि विधवा केशवपनाविरुद्ध त्यांनी केलेले आंदोलन हे याचे गमक आहे. ब्राह्मण व तत्सम उच्च जातीतच विधवाविवाह निषिद्ध मानला जाई. विधवांचे केशवपन करण्याची बीभत्स चालही याच वर्णीयात रूढ होती. १८६० च्या आसपास जोतीरावांनी एका ब्राह्मण विधवेचा एका सारस्वत पुरुषाशी पुनर्विवाह घडवून आणला. विधवाविवाहाची महाराष्ट्रीतील तोपर्यंतची ही केवळ दुसरी घटना होती. पुण्यातील ब्राह्मणांना वाटले, आपले नाक कापण्याचा हा एका शूद्राचा उद्योग आहे. त्यांच्या अहंकाराला ठेच लागली.

जोतीरावांच्या आणखी दुसऱ्या एका उपक्रमाने तर ब्राह्मण मंडळी अधिकच कोपली. हा उपक्रम तर अद्भुत व साहसपूर्ण होता. एक दिवस जोतीरावांनी पुण्यातल्या भिंतीवर एक जाहिरात चिकटवली. 'मोहाला बळी पडून कोणा विधवेचा पाय वाकडा पडला आणि तिला मूल झाले तर तिने खुशाल आपले मूल माझ्या घरी आणून ठेवावे; मी त्याचे पालनपोषण करीन.'

त्या अगोदर जोतीरावांनी आत्महत्येसाठी निघालेल्या एका ब्राह्मण विधवेचा प्राण वाचवून तिच्या अवैध मुलाला आपल्या घरी ठेवून घेतले होते. याच मुलाला—यशवंतला त्यांनी पुढे दत्तक घेतले, त्याचे शिक्षण केले आणि आपला वारसा दिला. जोतीरावांनी आपल्या घरी एक अनाथ बालसंगोपन गृह सुरू केले. पुण्यातल्या ब्राह्मणांना वाटले, आपले पाप चव्हाट्यावर आणण्याचा हा जोतीरावांचा दुष्ट खटाटोप आहे.


**हिंदूंच्या नसबंदीस जबाबदार अल्पसंख्य आणि उद्योगपती**

या खळबळजनक विषयावरील श्री. नवल टाटा – डॉ. सुधीर हेंद्रे यांचा परखड व उद्वेगजनक पत्रव्यवहार तसेच डॉ. वी. एन. पुरंदरे व डॉ. दत्ता पै यांना मिळालेल्या पद्मश्री किताबाचे रहस्य इंडियन डेमोग्राफरच्या नोव्हेंबर ७३ च्या अंकात वाचा. वार्षिक वर्गणी सहा रुपये.

लिहा :– **इंडियन डेमोग्राफर**

५२ वॉर्डन कोर्ट गोवालिया टँक रोड, मुंबई ३६. टें. नं. ३५८४५९.

ब्राह्मण विधवांच्या केशवपनाच्या पद्धतीला जोतीरावांनी जबर विरोध केला. ब्राह्मण असो की शूद्र असो सर्व स्त्रियांविषयी जोतीरावांच्या मनात असलेल्या समान समताभावनेचे ते चिन्ह होते. विधवांचे केशवपन म्हणजे विधवाविषयीच्या पुरुषमनातील घृणास्पद अविश्वासाचे प्रतीक होते. अगोदरच दुःखपूर्ण असलेले विधवेचे जीवन अधिक दुःखी व कुरूप बनविण्याचा तो प्रयत्न होता. जोतीरावांनी मुंबई-पुण्यात न्हाव्यांची एक मोठी सभा बोलावली आणि विधवांच्या केशवपनासारख्या निर्लज्ज व निर्दय रूढीविरूद्ध सक्रिय असहकार करण्याचे त्यांना आवाहन केली. न्हाव्यांनी विधवांचे केशवपन बंद केले. इंग्लंडमध्ये ही अभूतपूर्व खबर पोचली. तेथील महिला संघटनांनी या उपक्रमाचे स्वागत करणारा एक ठराव केला.

'आधी तुमच्या घरात सुधारणा लागू करा,' असा खोडसाळ उपदेश जोतीरावांना करण्याचे धाडस त्यांच्या विरोधकांना जोतीरावांनी करूच दिले नाही. मुलासाठी दुसरा विवाह करण्याची परवानगी त्यांनी आपल्या पत्नीला – सावित्रीला तात्त्विकदृष्ट्या तर दिली होतीच. जोतीरावांच्या सुधारकी कार्याविरूद्ध पुण्यातील सनातन्यांनी कोलाहल सुरू केला आणि जोतीरावांच्या वडलांवर मुलाला हाकलून लावण्यासाठी दडपण आणले. वडील त्याला झुकले आणि त्यांनी आपल्या मुलाला घराबाहेर काढले. त्यावेळीही जोतीरावांनी, 'तुझी इच्छा असेल तरच माझ्याबरोबर ये' असे आपल्या पत्नीला सांगितले.

सावित्री जोतीरावांबरोबर बाहेर पडली. त्यांनी पुण्यात वेगळे बिऱ्हाड केले. पण जोतीरावांनी आपल्या पत्नीला 'रांधा, वाढा व उष्टी खरकटी काढा' या स्त्री जन्माला लाभलेल्या कामातच जखडून ठेवले नाही. त्यांनी सावित्रीला अगदी 'ग, म, भ, न,' पासून शिकविले. शिक्षिका म्हणून प्रशिक्षित केले. आणि आपल्याबरोबर शिक्षकाचे काम करण्याची संधी दिली. जोतीरावांनी काढलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या त्याच मुख्याध्यापिका होत्या. पुढे अनाथ बालसंगोपनगृह, दुष्काळ निवारण, अस्पृश्यता निवारण इत्यादी जोतीरावांच्या सर्व कार्यात सावित्राने जोतीरावांच्या खांद्याला खांदा भिडवून काम केले. जोतीरावांच्या मृत्यूपर्यंत सावित्राने त्यांना साथ दिली.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात जोती-सावित्रा हीच कदाचित् सार्वजनिक कार्यकर्त्या पती-पत्नीची पहिलीच जोडी असेल. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या सनातनी पुण्यात हा जोडा किती कुतुहलाचा आणि कदाचित् तितक्याच कुटाळकीचा विषय झाला असेल याची आज फक्त कल्पनाच करता येईल.

● ● ●

**(म. जोतीराव फुले यांची ८४ वी पुण्यतिथी (मृत्यू २८–११ –१८९०)**

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## जगभर जाहिरात का म्हणून ?

एकदा सहज 'टाईम'चा अंक चाळून बघावा म्हणून हाती घेतला. ठळक अक्षरात छापलं होतं–'आज-काल भारतीय लोकांमध्ये लाचलुचपतीचं प्रमाण भयंकर वाढलंय, मोठमोठे ऑफिसर लोकसुद्धा लाच खातात म्हणे !' हे वाचून मला भयंकर राग आला. 'टाईम'चं विधान शंभर टक्के खरं असलं तरीसुद्धा मला राग आला. मी तो अंक तत्काळ बाजूला टाकला. माझा देशाभिमान एकदम उफाळून उठला. एखादा मुलगा चोर आहे हे घरच्या लोकांना माहीत असलं तरी आजूबाजूच्या चार लोकांनी त्याच्याकडे चोर म्हणून बोट दाखवलं तर साहाजिकच घरच्या लोकांच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. एक साधं उदाहरण सांगते. माझी कामवाली बुद्दी फार प्रामाणिक आहे. पण तिचा गणो (उर्फ गणेश) अट्टल चोर आहे. एकदा त्याची चोरी पकडली गेली तेव्हा बुद्दीला मी म्हटलं– 'बघ तुझा गणो पक्का चोर निघालाय्.' ती अशी काही संतापली की विचारू नका. तर हे असं आहे. आमचे भारतीय ऑफिसरसुद्धा लाच खाण्यात पटाईत आहेत हे आम्हाला चांगलं माहीत आहे. पण म्हणून 'आमच्या' लोकांच्या दुर्गुणांची जाहिरात अमेरिकेपर्यंत का व्हावी हेच आम्हाला कळत नाही. म्हणून तर आमचा संताप उफाळून येतो.

'टाईम'ने असा उपहास केला म्हणून आम्हा भारतीयांना भयंकर राग आला. मग आमच्या वर्तमानपत्रवाल्यांनी टाईमचा कडक निषेध केला. आमच्या वर्तमानपत्रवाल्यांचं त्याबद्दल म्हणजे लाच खाणाऱ्यांची बाजू घेऊन टाईमवर लेखणीने कोरडे ओढल्याबद्दल आम्ही जाहीर अभिनंदन केलं. आता ह्या खटाटोपात लाच खाणाऱ्यांबद्दल अप्रत्यक्षपणे जिव्हाळाच दाखवला गेला त्याला आमचा नाईलाज आहे ! ●

## प्लॅस्टिकचे नाक

संभाषण रंगात आलं होतं.

'पहा ना, ह्या लोकांना लाजा आहेत का काही ?'

'काय झालं ?'

'कालच्या वर्तमानपत्रात त्यांचे चक्क फोटो प्रसिद्ध झाले आहेत, पाहिले नाहीत ? त्या सगळ्यांना दोरीने बांधून रस्त्यावरून त्यांची धिंड काढण्यात आली. भेसळ करून माल विकतात म्हणून, माल दाबून ठेवतात म्हणून किंवा काळे पैसे घेऊन मगच विकतात

म्हणून अन् असल्याच अनेक कारणां- वरून.'

'पाहिलेत मी फोटो. पण त्यांना काय त्याचं?' उद्या जामिनावर सुटतील नि पुन: तेच करतील. 'बेपारी' माणूस पक्का निर्लज्ज असतो.'

'पण रस्त्यावरून धिंड काढली जावी ही केवढी नामुष्कीची गोष्ट!'

'काही नाही. हे लोक प्लॅस्टिकचं नाक लावूनच जगात वावरत असतात आणि दुसरं तसलंच एक जवळ बाळ- गीत असतात. एक नाक कापलं गेलं की चटकन् दुसरं बसवून घेतात. त्यामुळे आपलं नाक कापलं गेलं याचं त्यांना मुळी दु:खच होत नाही!' ●

## आधीच मोठा उल्हास

घाणेरडेपणाच्या बाबतीत कल- कत्त्याचं नाव आधीच बदनाम आहे. 'कलकत्ता म्हणजे गार्बेज' असं समी- करणच तयार झालं आहे. कारण या शहरात कचऱ्याच्या ढिगांचे डोंगर दिवसेंदिवस वाढतच आहेत. कार्पो- रेशनच्या आदर्श (?) कार्यक्षमतेचे हे परिणाम! दुसरं काय!

दुर्गापूजा आली तशी लोकांनी खूप ओरड केली. मुख्यमंत्र्यांच्या कानापर्यंत तो आवाज गेला. मग त्यांनी एक फर्मान काढलं— दुर्गापूजेत षष्ठीपर्यंत रस्त्या- वरचे कचऱ्यांचे सर्व ढीग नष्ट झालेच पाहिजेत. ते न झाले तर त्या त्या विभागाची जबाबदारी सोपवलेल्या संबंधित व्यक्तीला कडक शासन कर- ण्यात येईल.

कार्पोरेशन थोडीशी थरथरली. आणि वेगाने कामाला लागली. समोरचे ढीग मागे सरकले एवढाच फरक झाला. मुख्यमंत्री स्वत: चुपचाप रस्त्यावरून हिंडले. कुणाला न कळवता. स्वत:च्या डोळ्यांनी वस्तुस्थिती पाहिली. पूर्वी- पेक्षा फरक त्यांना निश्चितच जाणवला. आणि एके ठिकाणी मात्र चक्क देवीच्या मांडवासमोरच भलामोठा कचऱ्याचा डोलार त्यांना दिसला. त्या मांडवातून दुर्गादेवी आपल्या परिवारासह समोरच्या कचऱ्याच्या ढिगाकडे नजर लावून बसली होती.

दुर्गापूजा संपली. हळूहळू कचऱ्याचे ढीग पुन: पूर्वस्थान बळकावू लागले. मग इंदिरा गांधी यायच्या होत्या. एक संपूर्ण दिवस इथे रहायच्या होत्या. कार्पोरेशन पुन: सावधान झाली. इंदिराजी जाणार फक्त राजरस्त्या- वरूनच हे समजण्याइतकी कार्पोरेशन चलाख आहे. मग त्यांनी आदेश दिला आणि कचऱ्याचे ढीग काही काळ गल्ल्यामध्ये लपून बसले. थोड्याच दिवसात पुन: येरे माझ्या मागल्या...

सगळ्याच वस्तुंच्या भावांचे आलेख भराभर वर चढू लागले. पेट्रोलचा तरी का म्हणून अपवाद ठरवा? पेट्रोलचे भाव वाढल्याने सगळ्या देशातच हल- चल माजली. आमच्याकडे टॅक्सीवाले, बसवाले हरताळ पाळताहेत. पण मुख्य पंचाईत आता कार्पोरेशनची झालीय्.

कधी नव्हे ती कार्पोरेशन एकाएकी कर्तव्यदक्ष झाली. पण हाय ! तिचा अगदीच नाइलाज झालाय् हो ! चांगल्या चाळीस लॉन्या हाताशी असताना पेट्रोलच्या टंचाईमुळे ह्या आता वापरता येणार नाहीत. डिझेलवर चालणाऱ्या केवळ चवदा लॉन्यांवर काम भागवावं लागणार. आता तुम्हीच सांगा हा गार्बेज क्लिअर होणार तरी कसा ? बिच्चारी कार्पोरेशन ! आधीच तिला मोठा उल्हास होता. त्यात पेट्रोलच्या टंचाईचा फाल्गुन मास उगवला !

मला जबरदस्त आठवण होतेय् एका अमेरिकन हिप्पीने काढलेल्या उद्गारांची. तो म्हणाला होता– एक दिवस ही सारी पृथ्वी गार्बेजनी व्यापलेली राहील. माणसांना राहण्यास तिथे जागाच उरणार नाही. आणि त्या कचऱ्यामुळे निर्माण झालेलं पोलयूशन ? ते माणसाला जगणं मुष्कील करील.

कलकत्त्यापुरतं पाहिलं तरी ह्या म्हणण्यात तथ्यांश आहे असं वाटायला लागतं !

●

## ही आकडेवारी बघून काय वाटतं ?

आपल्या देशात फूटपाथवर झोपणाऱ्या लोकांची आकडेवारी पाहू गेल्यास मुंबईचा प्रथम क्रमांक लागतो असे दिसून आलं. मुंबईत एकूण ५९ हजार लोक फूटपाथवर झोपतात. कलकत्त्यात ४९ हजार लोकांचं फूटपाथवर वास्तव्य असतं. तेच मद्रासला फक्त ९ हजार आणि दिल्लीला ७ हजार असं प्रमाण दिसून येतं.

ही आकडेवारी बांधकाम विभागाच्या मंत्र्यांनी राज्यसभेत वाचून दाखवली व म्हटले की आता हळूहळू ह्यांच्यासाठी पण निवाऱ्याची सोय करण्यात येईल. ह्याप्रमाणे योजना आखणे सुरू आहे.

मंत्र्यांच्या योजना तयार होऊन त्या अंमलात येईपर्यंत ही आकडेवारी किती पायऱ्या वर चढून जाईल ते आपण नाही सांगू शकत.

● ● ●


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# एका कल्पक भामट्याची विस्मयजनक कथा

वसंत ज. डोळस

१९५५ मधील जानेवारी.

एके दिवशी जगातील बहुतेक सर्व मोठमोठ्या वर्तमानपत्रांतून एका व्यक्तीच्या हत्येची बातमी मोठ्या अक्षरात प्रसिद्ध झाली. या खुनाच्या बातमीने जवळ जवळ दोन तृतीयांश जगात एकच खळबळ उडवून दिली. खून झालेल्या व्यक्तीचे नाव होते, रुबीन्टाइन. ती व्यक्ती म्हणजे एक आश्चर्य होतं. एक जिनियस ! त्यानं जर मनात आणले असते तर तो जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ बनू शकला असता. परंतु तो त्या मार्गाला गेला नाही. तो आपल्या जमान्यातील जगविख्यात सर्व चोरांचा बापच बनला !

टोकियो, लंडन, पॅरिसमध्ये, ॲम्स्टरडॅम, न्यूयॉर्क आणि टोरॅन्टो या जगाच्या विविध भागात असे काही लोक आहेत की, जे त्याला मरेपर्यंत विसरू शकणार नाहीत.

जपानमधील गोष्ट सांगावयाची झाल्यास ज्यावेळी जपानपुढे नाणे निधीची समस्या गंभीरपणे उभी राहिली होती आणि येनच्या निर्यातीवर कडक असे निर्बंध घातले होते, त्यावेळी रुबीन्टाइनने जपानमधून १० लाख किमतीची जपानी येनची नाणी जपानबाहेर पळवून नेली होती आणि सहीसलामत बाहेर पडल्यावर त्याने स्वतःच या गोष्टीचा स्फोट साऱ्या जगात केला. त्यामुळे त्यावेळच्या जपानच्या अर्थव्यवस्थेवर अधिकच गंभीर असा परिणाम झाला.

आता इंग्लंडमधील त्याच्या करामती पहा. एक शिलिंगही उद्योगधंद्यात न

गुतविता त्याने अक्कल हुशारीने एक प्रचंड खनिज उद्योगाचा कब्जा स्वतःकडे घेतला आणि प्रसिद्ध इंग्लिश अर्थ-शास्त्रज्ञांच्या समोर, [धनिकांसमोर, बघता बघता हा]॓ भामटा सर्व पैसा लंपास करून निघून गेला. पण उद्योगाचे दिवाळे यानेच काढले असे म्हणून कुणीही त्याच्याकडे बोट दाखवू शकले नाही.

आता न्यूयॉर्ककडे चला—न्यूयॉर्कमध्ये आठ वर्षे त्याचे वास्तव्य होते. तेथे त्याच्यावर 'सिक्युरिटीज विनिमय आयोगा'ने खटला भरला. फसवेगिरी व अफरातफरीच्या संदर्भात हा खटला होता. अर्थात हा खटला तो ज्या उद्योगसमूहात होता त्यातील धनिक लोकांकडून (Collective Resposibility) सामूहिक जबाबदारी या तत्वा-वर चालविला जाणार होता. त्यासाठी त्याने सर्वांकडून ५० लाख डॉलर्स जमा केले आणि बघता बघता तो सर्वांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला. पण त्याचं कुणीच वाकडं करू शकलं नाही.

जर रुबीन्टाइनच्या या सर्व उद्योगा-वरून त्याची चार्ल्स पोंजी किंवा मिसि-सिपीतील प्रख्यात बदमाश जॉन लॉ यांच्याशी तुलना केली तर तो खळखळून हसत असे आणि आनंदाने वेडापिसा होत असे. मात्र तो स्वतःला आपल्या काळातील जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ समजत असे.

त्याचे व्यापारविषयक सिद्धान्त मौलिक होते. संसदांकडून किंवा आंतर-राष्ट्रीय आयोगांकडून केल्या गेलेल्या कायद्यांप्रमाणे चालणारा प्राणी तो नव्हता.

कायद्याच्या कचाटयातून निसटून भल्याबुऱ्या मार्गांनी कोटयवधी रुपये मिळविण्याचा तर त्याला छंद होताच, पण खाजगी जीवनातही चांगलाच रंगेल होता. राजा-महाराजांप्रमाणे किंवा संस्थानिक नबाबांप्रमाणे त्याच्या पन्नास-साठ रखेल्या होत्या.

ज्या दिवशी त्याचा खून झाला, त्या दिवशी दुपारचे जेवण त्याने एका मैत्रिणीसमवेत घेतले होते. तर डिनर पार्टी दुसऱ्या मैत्रिणीसमवेत घेतली होती आणि रात्री दोन वाजता एका सुंदर तरुणीला तो शय्यासोबतीसाठी टेलिफोनवरून बोलावीत होता.

आठवडयाच्या शेवटच्या दिवशी तो कधी कधी मियामीच्या सागराकडे जात असे. त्यावेळी त्याच्या सभोवार तरुण नि देखण्या तरुणींचा तांडा असे.

मध्यम उंचीचा व जाडजूड देह-यष्टीचा, हिरवट निळसर डोळयांचा नि तिखट आवाजाचा रुबीन्टाइन एखाद्या राजघराण्यातील राजपुरुषा-सारखा रहात असे आणि त्याचे शौकही राजघराण्यातील लोकांप्रमाणेच होते. हिवाळयात तो न्यूयॉर्कमधील फिफ्थ अव्हेन्यूमधील आपल्या सहा मजली भव्य निवासात रहात असे. तो वर्षातून तीन वेळा लोकांना मोठमोठया पार्टर्या देत असे. अशा पार्टर्यांना 'ग्रॅन्ड बाल्स' म्हणतात. या पार्टर्यांच्या वेळी तो नेपोलियनच्या पेहरावात निमंत्रितांपुढे येत असे. दिसायला तो नेपोलियन-सारखाच होता.

त्याला आणखी एक अभिनय करण्याचा नाद होता आणि ते पात्र म्हणजे रशियन राजदरबारातील सामन्त किंवा सरदार. त्याच्या शयनगृहात भारी भारी किमतीचे गालिचे पसरलेले होते. संगमरवरातील त्याची शेकोटी आणि साटीनच्या कापडाची त्याच्या पलंगावरील छत्री ह्या गोष्टी त्याच्या विलासप्रिय स्वभावाचीच चुणूक दाखवून जातात. त्याने मारलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे व पत्ते यांनी किती तरी पाने भरली होती. त्या सूचीत कमीत कमी २००० पत्ते होते. त्यात जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती, प्रसिद्ध वकील, न्यायाधीश, प्रचारक, पत्रकार, टेलिफोन करताच शयनगृहात ताबडतोब हजर होणाऱ्या वेश्या, धमक्या देऊन लोकांचे पैसे लुबाडणारे, रखेल्या व हॉटेलचे वेटर्स इत्यादींची नावे होती.

या २००० व्यक्तींच्या सूचीत असलेल्या एका व्यक्तीने त्याचा खून केला होता. पण खुनाच्या आरोपाखाली पोलीस नेमके कोणाकडे बोट करणार ? आणि या खुनाचे धागेदोरे कोठून उलगडायला सुरुवात करावी हाही प्रश्न होता.

सर्ज रुबीन्टाइनचा जन्म रशियातील सेंटपिटसबर्ग (आताच्या लेनिनग्रॅड) येथे १९०८ मध्ये झाला. झारच्या राजवटीत त्याचे पिता एक प्रख्यात बँकर होते. बँकिंगच्या व्यवसायात त्यांनी कोटचवधी रुबल्स कमावले होते. रुबीन्टाइनचे कुटुंब मोठ्या सुखात दिवस घालवीत होते.

१९१८ मध्ये बोल्शेव्हिक क्रांतीच्या सुरुवातीलाच रुबीन्टाइनचे कुटुंब रशियातून पळून गेले. बरेच दिवस हे लोक युरोप खंडात भटकत होते. नंतर पॅरिसमध्ये येऊन ते स्थायिक झाले.

अठराव्या वर्षी सर्ज रुबीन्टाइनने वडिलांइतकी संपत्ती मिळविण्याचा व ऐषारामात जीवन व्यतीत करण्याचा संकल्प मनाशी केला. परन्तु आपला संकल्प पूर्ण करण्यासाठी शिक्षणाची व अनुभवाची आवश्यकता आहे ही गोष्ट त्याच्या मनाला पटली.

त्याला रशियन, इंग्रजी, स्वीडिश आणि जर्मन भाषा चांगल्या अवगत होत्या. पण लॅटिन मात्र त्याला अवगत नव्हती. आणि लॅटिन येत नसेल तर युरोपमधील कोणत्याही विश्वविद्यालयात त्याला प्रवेश मिळाला नसता.

रुबीन्टाइन लंडनला आला. एक लॅटिन डिक्शनरी आणि पाटचा, पुस्तके घेऊन तो शाळेत दाखल झाला. तीन महिने कठोर परिश्रम करून त्याने लॅटिन भाषेवर चांगलेच प्रभुत्त्व मिळविले. त्यानंतर लगेच त्याला केंब्रिजच्या विश्वविद्यालयात प्रवेश मिळाला.

सर्ज रुबीन्टाइनच्या बुद्धिमत्तेबद्दल कोणालाच संदेह नव्हता. त्याने अवघ्या तीन महिन्यात लॅटिनसारख्या किचकट भाषेवर प्रभुत्त्व मिळविले होते. त्याच चिकाटीने त्याने केंब्रिज विश्वविद्यालयात राहून अभ्यास केला. तेथे राहून अर्थशास्त्राचे सर्व ज्ञान त्याने तीनच वर्षात ग्रहण केले.

विश्वविद्यालयात तो इतका हुशार

विद्यार्थी होता की, त्यावेळचे इंग्लंडचे प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनर्ड केइन्स एकदा त्याला म्हणाले होते की, 'तू जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ होशील !'

विश्वविद्यालयीन अभ्यासक्रम यशस्वीपणे पार पाडून वयाच्या एकविसाव्या वर्षी पदवीधर होऊन रुबीन्टाइन पॅरिसला परतला आणि 'बँक फ्रांको एशियाटिकमध्ये' कारकून म्हणून रुजू झाला. वरच्या पदावर पोहचता पोहचता शेवटी तो बँकेचा मॅनेजिंग डायरेक्टरच झाला. त्या पदाचा चार्ज घेताच रशियातून शरणार्थी म्हणून आलेल्या व्यक्तींना या बँकेत नोकऱ्या देण्याचा त्याने सपाटा चालविला. कारण त्याचा विश्वास होता की, प्रसंग आला तर आपले देशबांधव इतरांपेक्षा लवकर आपल्या पाठीशी उभे राहतील.

बँक फ्रांको-एशियाटिकच्या मॅनेजिंग डायरेक्टर पदावर काम करताना त्याची नजर रेस्टॉरंटच्या लॉकरमधील साडेचार लाख फ्रँकच्या पेटयांकडे गेली. या व्यापारी संघटनेचा कारभार ६० हजार फ्रँक खर्च केल्यास हातात येणार होता. रुबीन्टाइनने बँकेत जमा झालेल्या सार्वजनिक संपत्तीमधून ६० हजार फ्रँक उडविले आणि त्यावर रेस्टारंटच्या कंपनीचा कारभार हातात घेतल्यावर त्याने आंतरराष्ट्रीय नाणे निधीत आपला हात दाखवायला सुरुवात केली.

धीरे धीरे फ्रान्सच्या फ्रँकला त्याने आर्थिक डावपेचांनी आपत्तीत लोटून दिले. फ्रान्सच्या शासनाने त्याला तावडतोब फ्रान्स सोडून जाण्यास फर्माविले. तो फ्रान्स सोडून गेला. पण जाताना सर्व संपत्तीही घेऊन गेला.

नंतर तो इंग्लंडमध्ये आला. तेथे आल्यावरही त्याचे उद्योग चालूच होते. त्याने असे काही डाव टाकले की, वयाच्या पंचविसाव्या वर्षी तो 'करोडपतीच' झाला.

एके दिवशी एक इंग्रज गृहस्थ स्वतःची कैफियत घेऊन त्याच्याकडे आले. तो एका खनिज उद्योग समूहाचा डायरेक्टर होता. त्याने आपला बहुतेक सर्व पैसा कोरियातील उद्योगात गुंतविला होता. आपल्याच कंपनीच्या शेअर्सची बेकायदा विक्री केल्यावरून त्याच्यावर खटला भरला होता व त्यात त्याला कारावासाची शिक्षा व दंड होणार हे जवळ जवळ स्पष्ट दिसत होते. आपला एक प्रस्ताव त्याने रुबीन्टाइन पुढे मांडला – तो प्रस्ताव असा होता – चोजेन कार्पोरेशनचे १ लाख ७३ हजार शेअर्स रुबीन्टाइनने विकत घ्यावेत. हे शेअर्स स्वतात विकले जात होते. कारण त्या मागे त्या व्यक्तींचा डाव होता. शेअर्सची जमा झालेली रक्कम घेऊन तो अफरातफरीचा आरोप खोटा ठरविण्याचा प्रयत्न करणार होता.

रुबीन्टाइन या व्यावसायिक बंधुच्या मदतीला लगेच धावून गेला. कारण या शेअर्सच्या खरेदीसाठी त्याला एक पेनीदेखील खर्चावी लागली नाही. १ लाख ७३ हजार शेअर्सची किंमत देण्यासाठी म्हणून प्रत्यक्षात त्याला थोडीशी रक्कम द्यावी लागणार होती. पण तीही त्याने

रोख दिली नाही. तर आपल्याच बँक फ्रांको एशियाटिकवरील एका चेकद्वारा दिली. मात्र चेकची रक्कम बँकेत जमाच झालेली नव्हती. तरीदेखील रुबीन्टाइनला काहीच झाले नाही. इंग्रज ऑफिसरला मात्र या प्रकरणी जेलमध्ये जाण्याची पाळी आली. आणि रुबीन्टाइन मात्र चोजेनच्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या पदावर कायम राहिला.

त्यानंतर रुबीन्टाइनने लंडनमधील एका विलासी व अतिभव्य 'सेवॉय' हॉटेलचा एक भाग भाड्याने घेतला. आणि तेथे तो ऐषारामात राहू लागला. इंग्लंडमधील मोठमोठ्या व्यापाऱ्यांना, संसद सदस्यांना आणि प्रतिष्ठित लोकांना पार्ट्यांसाठी बोलावू लागला. रशियात जन्मलेल्या, इंग्लंडमध्ये शिक्षण घेतलेल्या आणि पॅरिसमध्ये लखपती बनलेल्या या अर्थशास्त्रज्ञाला भेटायला सर्व थरातील लोक सारख्याच उत्सुकतेने येत.

त्यानंतर त्याने पॅरिसमधील आपल्या विश्वासातील एका रशियन व्यक्तीस व इतर काही लोकांना लगेच इंग्लंडमध्ये बोलावून घेतले आणि फ्रान्समधील व्यापारी प्रतिनिधी मंडळ म्हणून तो त्याचा प्रचार इंग्लंडमध्ये करू लागला. चोजेन कार्पोरेशनच्या भागीदारांना त्याने सांगितले की, हे लोक पण चोजेन कार्पोरेशनमध्ये धन गुंतवू इच्छितात. आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीदेखील आंशीक भरणा करण्यासाठी दीड लाख शेअर्स विकले. रुबीन्टाइनने आंशिक भरणा योजनेला विना भरपायीची योजना बनविली.

अशा रीतीने कंपनीचा सर्व कारभा[र] रुबीन्टाइनच्या नियंत्रणात आला. आ[णि] त्याबरोबरच कोरियात कंपनीची [...] साठ लाख डॉलर्सची मालमत्ता हो[ती] तिच्यावरदेखील रुबीन्टाइनचा कब्[जा] आला.

सर्ज रुबीन्टाइन नंतर जपानक[डे] रवाना झाला. या प्रवासात आपले ना[व] काऊंटेस नताशा असे सांगणारी ए[क] हंगेरीयन सुंदरी त्याच्याबरोबर होती. जपानमध्ये त्याने थोड्याच अवधी[त] खनिज उद्योग, चोजेन कर्पोरेशन [व] इतर निरनिराळी नावे धारण केलेल्या कंपन्या विकून धन एकत्र केले. व सा[रे] धन स्वतःच्या नावावर जमा केले. य[ा] उद्योगात त्याला सुमारे ३५ लाख डॉलर्सची प्राप्ती झाली.

मात्र येथे त्याला एका कठीण समस्येशी सामना करावा लागला. १९३७ मध्ये जपानी चलन देशाबाहेर नेण्यास कायद्याने बंदी केली होती. मात्र आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारात विनिमय सर्रास होत होते. जपानच्या शासनाने रुबीन्टाइनच्या संपत्तीपैकी २/३ संपत्ती स्टर्लिंगच्या रूपात देशाबाहेर नेण्यास परवानगी दिली. त्याचे ११ लाख डॉलर्सच्या किंमतीचे धन जपानमध्ये गुंतून पडलेले होते.

आता एक प्रश्न रुबीन्टाइनच्या पुढे दत्त म्हणून उभा होता – आणि तो म्हणजे हे धन जपानबाहेर कसे घेऊन जायचे ?

आपण जपानी महिलांचा विशिष्ट

राजकीय पेहराव पाहिला आहे का? या स्त्रिया कमरेभोवती सुमारे सात वार कापड गुंडाळतात. त्याला 'ओबी' म्हणतात. हे कापड व्यापारी ताग्यातून देतात. मात्र ओबीचे कापड ताग्याच्या सभोवार गुंडाळतात.

रुबीन्टाइनच्या एका दलालाने कापडाचे व्यापारी आहोत. अशी बतावणी करून ओबीचे कापड म्हणून त्याने बरेचसे तागे खरेदी केले. या ताग्यामधून आत त्याने शंभर शंभर येनच्या नोटा गुप्तपणे ठासून भरल्या. अशा रीतीने त्याने १० लाख डॉलर्स किमतीच्या जपानी नोटा त्यात भरल्या आणि कापडाचे हे तागे घेऊन तो जपानच्या कस्टम्स अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळ फेकून जपानमधून निसटला.

रुबीन्टाइनने जपानमधून आणलेले १० लाख डॉलर्स किंमतीचे जपानी चलन वटवून पैसे हस्तगत केले. पण त्यामुळे जपानची अर्थव्यवस्था मात्र डबघाईला आली. आणि त्यानंतर अर्थव्यवस्था स्थिर होण्यासाठी कित्येक वर्षे लागली.

जे इंग्रज लोक चोजेन मायनिंग कार्पोरेशनचे शेअर्स विकत घेऊन तिचे भागीदार बनले होते त्यांना या घटनेची गंधवार्ताही नव्हती. त्यांना या गोष्टीचा थांगपत्ता जेव्हा ब्रिटिश सरकारला या प्रकरणात संशय आला तेव्हाच लागला. स्वतः ब्रिटिश सरकारने चोजेन कार्पोरेशनची चौकशी करावयास सुरुवात केली.

मात्र चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना बँकेत भरलेल्या रकमा चोजेन कार्पोरेशनशी संबंधित आहेत असा काहीच धागादोरा सापडला नाही. त्यामुळे ब्रिटनमधील भागीदार या निर्णयाने चांगलेच हवालदिल झाले. त्या सर्वांनी मिळून या प्रकरणी आपले वकिलपत्र एक प्रख्यात अमेरिकन वकील हॅरी जुक्कर यांना दिले.

चार वर्षांचा दीर्घ कालावधी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी खर्ची पडला. शेवटी या अफरातफरीची रक्कम सापडली. ही रक्कम न्यूयॉर्कला पोहचली होती. सर्ज रुबीन्टाइन द रावेललो स्वतः सार्जिया मॅन्युएल रुबीन्टाइन नामक नाव धारण करून आपण पोर्तुगाली नागरिक आहोत असे भासवीत १९३८ मध्ये अमेरिकेत आला.

पुढे चोजेन कार्पोरेशनने अफरातफरीबद्दल रुबीन्टाइनविरुद्ध खटला भरला. आणि बाजू मांडण्यासाठी लहानमोठ्या वकिलांची एक पलटणच तयार केली. त्यामुळे मात्र त्यांचा बचाव झाला. त्यामुळे खटल्याचा निकाल लागण्यास भलताच विलंब लागला. त्या विलंबामुळे वकिलांच्या फीवर होणारा खर्चही वाढला. आणि अखेर ब्रिटिश भागीदार कंटाळून गेले. शेवटी १९४६ मध्ये त्यांनी चोजेन कार्पोरेशनशी समेट केला. या बदल्यात चोजेन कार्पोरेशीची कोरियात जी मिळकत होती तिचा निम्मा हिस्सा ब्रिटिश भागीदारांना मिळाला. आणि अशा रीतीने रुबीन्टाइनला सुमारे २० लाख डॉलर्सची प्राप्ती झाली.

लुटीच्या या धनाला आपली अधिकृत पुंजी दाखवून रुबीन्टाइनने अमेरिकेत आपला हात दाखविण्यास सुरूवात केली. आणि त्यावर ५० लाख डॉलर्स कमविले. तो प्रथम कंपनी घेत असे. आणि भरमसाट पैसा काढून तिचे दिवाळे काढून तेथून काढता पाय घेत असे.

अशाच रीतीने त्याने एका तेल कंपनीत ३० लाख डॉलर्स कमविले होते. या प्रकरणी सरकारने त्याला तुरुंगात पाठविण्यासाठीही प्रयत्न केला. त्याच्या विरुद्ध अफरातफरीचे व विश्वासघाताचे आरोपही ठेवण्यात आले. रुबीन्टाइनने देशातील सर्वोत्तम वकिलाला वकीलपत्र दिले आणि त्याच्या कौशल्यामुळे रुबीन्टाइनची निर्दोष म्हणून मुक्तता झाली.

अशा रीतीने कायदे-नियमांच्या चिंधड्याउडवून रुबीन्टाइन सुख-विलासात आपलं जीवन व्यतीत करीत होता. त्याच्या या वागण्यामुळे एकाच वेळी अनेक आपत्तींची साखळीच्या साखळीच त्याच्यावर येऊन कोसळली.

तो स्वतः एक यहुदी होता. परंतु महायुद्ध चालू असताना जर्मनीला शरण आलेल्या यहुद्यांच्या सभेत त्याने उभे राहून सांगितले की, "जगात फक्त हिटलरसारखा नेताच राज्यकारभार करण्यास लायक आहे. एखादे दिवशी मी सुद्धा एक महान व्यक्ती म्हणून जगापुढे येईन!"

१९४१ मध्ये त्याने सहज एकदा बोलण्याच्या ओघात सांगितले की मी बनावट पासपोर्ट घेऊन अमेरिकेत आलो आहे. गप्पांच्या सहज ओघात बोललं गेलेलं हे बोलणं अमेरिकन अधिकाऱ्यांच्या कानावर गेलं. आणि ते लगेच त्याच्या मागावर लागले.

यानंतर काही दिवसांनी त्याने आपण अनिवार्य सैनिकी सेवा लागू करणाऱ्या एका अधिकाऱ्याला कसे फसविले हेही असेच गप्पांच्या ओघात आपल्या मित्रांजवळ सांगितले.

अनिवार्य सैनिकी सेवेपासून सुटका करून घेताना त्याने लाच दिली होती. त्याचप्रमाणे विमाने बनविणारी कंपनी खरेदी केल्याचेही सांगितले होते. त्याच्यावर भरण्यात आलेल्या वरील खटल्यात स्वतःच्या बचावासाठी त्याने जवळ जवळ पाच लाख डॉलर्स खर्च केले. यावेळी मात्र संपूर्ण देशातील जनतेची क्रुद्ध नजर त्यांच्याकडे होती. पैशाच्या जोरावर या माणसाने सैनिकी सेवेपासून स्वतःची सुटका करून घेतली म्हणून सर्वसामान्य जनतेचा स्वाभिमान साहजिकच डिवचला गेला होता. पुढे त्याचप्रकरणी जनतेने आवाज उठविल्यामुळे त्याच्यावर खटला भरण्यात आला. त्यात त्याला दंड व दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

१९५४ च्या सुरुवातीला रुबीन्टाइन हा माणूस भलताच श्रीमंत बनलेला होता. बँकांमध्ये त्याच्या खात्यावर कोट्यवधी रुपये जमा होते. परंतु तो मात्र बदनाम झाला होता. आता अधिकारी वर्ग त्याच्या पाळतीवर होता. फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टीगेशनचे

अधिकारी चोवीस तास त्याच्या पाळतीवर होते.

अनिवार्य सैनिकी सेवेच्या संदर्भात भरण्यात आलेल्या खटल्यापासून अमेरिकेतील कित्येक राज्यात एक नालायक माणूस म्हणून त्याची दुष्कीर्ती पसरली होती.

पुढे पुढे वर्तमानपत्रातून त्याच्याबद्दल इतक्या भल्याबुऱ्या बातम्या, अफवा येऊ लागल्या की, आता एखादे कारस्थान जर करावयाचे झाले तर ते पडद्याआड राहूनच त्याला करावे लागे. एखाद्या उद्योग समूहात रुबीन्टाइन आला आहे असे कळताच लोक धडाधड आपली भागिदारी काढून घेत.

त्याचा शेवट फारच आकस्मिकरीत्या झाला. २७ जानेवारी १९५५ या दिवशी सकाळी न्यूयॉर्कमधील आपल्या निवासस्थानात तो मृतावस्थेत आढळला. गळा दाबून त्याचा जीव घेण्यात आला होता. त्याच्या तोंडावर टेप चिकटविली होती. त्याचे हातपाय पडद्याच्या दोरीने बांधण्यात आलेले होते. त्याच्या शयनगृहात चोहीकडे सामान अस्ताव्यस्त विखुरलेले होते.

त्याचा खुनी कुणी का असेना, पण त्याने एका देशद्रोही व राष्ट्रघातकी माणसाचा खून केला होता. मरणापूर्वी काही दिवसांपासून पडद्याच्या आडून पनामा व क्यूबामधील स्थापित बनावट कंपन्या वॉल स्ट्रीटवरील एका प्रख्यात फर्मला विकण्याच्या संदर्भात त्याच्या वाटाघाटी चालू होत्या. तो जर आणखी काही दिवस जिवंत राहिला असता तर त्याने वरील एका प्रख्यात फर्मला नक्कीच बनविले असते.

या जगविख्यात चोरात अन् इतर चोरात फारच अंतर आहे. दुसरे चोर लुटारू आणि बदमाश होते. छोट्या छोट्या चोरांना लुटणारे होते. पण रुबीन्टाइन हा त्यातला नव्हता. तो त्या सर्वांचा बाप ठरणारा असा होता. रुबीन्टाइनने आपल्या काळातील प्रख्यात अर्थशास्त्रज्ञांना व व्यापाऱ्यांना फसविले. आपल्या अर्थशास्त्राच्या ज्ञानावर ज्याप्रमाणे त्याने विद्वान व अनुभवी लोकांना पाणी पाजले, त्याचप्रमाणे त्या सर्व गुन्ह्यातूनही काही अपवाद वगळल्यास तो सहीसलामत सुटला.

त्याने मनात आणले असते तर हेच करोडो रुपये तो प्रामाणिकपणे स्वतःच्या अक्कलहुशारीवरही मिळवू शकला असता. जगातील विख्यात अर्थशास्त्रज्ञ म्हणून पुढच्या पिढीने आदराने त्याच्याकडे बोट दाखविले असते. पण त्याने लोकांना ठकविण्याचा जो मार्ग पत्करला त्यामुळेच तो एका दैदिप्यमान जीवनाला मुकला.

त्याच्याजवळ जी एक वस्तू उरली होती तिच्यासाठी त्याने हयातीत लाखो डॉलर्स पाण्यासारखे खर्ची घातले होते. ती वस्तु म्हणजे त्याचा प्राण! तीही अखेर कुणीतरी त्याचा वध करून त्याच्यापासून हिरावून घेतली होती.

● ● ●

# लिपीतज्ज्ञ वाकणकर

दादूमिया

धंद्याने इंजिनियर असून रसायनशास्त्रावर आपली उपजीविका करणारे, संपूर्ण राष्ट्रवादी, संशोधनाची आवड असलेले, मराठी उद्योगपती असून मराठी माणसास उत्तेजन देणारे – श्री. वाकणकर यांचे नाव मी बरेच ऐकले होते. पण भेटण्याचा योग कधी आला नव्हता.

परवा बडोद्यास फोटो कंपोजिंगच्या बाबतीत त्यांनी जे संशोधन केले आहे त्याची माहिती देण्यासाठी ते बडोद्यास नानूभाई अमीन या गुजराथच्या किर्लोस्करांकडे उतरले होते. ज्योति कारखान्यात त्यांचे त्या संशोधनावर भाषणही झाले. भाषण संपल्यावर नानुभाई अमीन यांनी वाकणकरांना लिप्यांवरील त्यांच्या संशोधनासंबंधी माहिती सांगण्याची विनंती केली. ती माहिती त्यांनी आनंदाने श्रोत्यांना सांगितली व त्यांना मंत्रमुग्ध केले. मी त्या श्रोतृवृंदात होतो. मी अक्षरश: भारला गेलो होतो. म्हणून मी त्यांना गाठून त्यांची मुलाखत घेतली. मुलाखत मोठी रंगली.

मी त्यांना विचारले, 'वाकणकर साहेब, आपले नाव मी बरेच वेळा ऐकले आहे. 'विवेक' किंवा 'हिंदुविश्व'मधले आपले लेख वाचले आहेत मला मोठे आश्चर्य वाटायचे, इंजिनियर असून आपण या राष्ट्रवादी प्रवृत्तीत एवढा रस घेता.'

: डॉक्टर, मला साहेबविहेब म्हणू नका. मी एक साधा अभ्यासक आहे.

: पण इंजिनियर असून याकडे आपले लक्ष कसे गेले ?

: मी धारचा. लहानपणी गावात शिलालेखांचे तुकडे इतस्ततः विखुरलेले मी पाहात असे. ते वाचण्याची जिज्ञासा जागृत झाली. त्यासाठी मी विख्यात इतिहासकार कै. काशीनाथ कृष्ण लेले यांच्याकडे जाऊन बसत असे. त्यांनीच मला प्राचीन शिलालेख कसे वाचावे याचे शिक्षण दिले. गेली पंचेचाळीस वर्षे तो छंद चालूच आहे.

: ह्या छंदाने वैयक्तिक फायदा काय झाला ?

: आर्थिकदृष्टया काही नाही. मी त्याकडे ह्या दृष्टीने पाहिलेच नाही. मात्र देशातील व परदेशातील अनेक विद्वान, कलावंत व इतिहासकारांशी या छंदामुळे संबंध जुळून आले. तर्कदृष्टी व शास्त्राच्या अभ्यासाची बैठक यांच्यामुळे लिप्यातील समान आकृतीधर्माचा शोध लावता आला. या कामात वालावलकरांची फार मोठी मदत झाली. हेही रेल्वेत इंजिनियरच होते.

: या लिप्यात समान धर्म आहे असे आता तुम्ही म्हणालात. तो कोणता ?

: अशोकाची ब्राह्मी लिपी ही सर्व भारतीय लिप्यांची मूळ लिपी अशी एक समजूत प्रचलित आहे. त्याहून जुने भारतीय लेख उपलब्ध नाहीत असे आमचे कॉलेजातील प्राध्यापक शिकवितात. माझी पूर्वी तशीच समजूत होती. मात्र गेल्या काही वर्षांतील उत्खननात अशोकपूर्व शिलालेख बरेच सापडले. मोहेंजोदारो, लोथल वगैरे उत्खननामुळे या पाश्चात्यांची तोंडेच बंद झाली. लंडनच्या ब्रिटीश म्युझियम, पॅरीसच्या ल्यूरमधील काही विटा व मुद्रांवरील लेखामुळे अशोकपूर्व ब्राह्मी लिपीचे स्वरूप प्रकाशात आले. आपल्याकडील व्याकरण जेवढे तर्कशुद्ध व पर्फेक्ट आहे तेवढी आपली लिपीची मूळ बैठकही पर्फेक्ट आहे हे जगास कळून चुकले.

: याचा अर्थ बंगालीमधील क व गुजरायी किंवा तमीळमधील क सारखाच काय ?

: अगदी सारखा. मौर्य व गुप्त कालानंतर देशातील सांस्कृतिक सामंजस्य ओसरत गेले व प्रांतीय शैलीत बदल घडू लागले. त्यांचे तोंडावळे आज एवढे बदलले आहेत की हिंदीवाल्यांना तमीळ, मल्याळम् सख्ख्या बहिणी असून परक्या वाटू लागल्या आहेत. अशा वातावरणात मुद्रणकला भारतात आली व हे भेद पक्के व दृढमूल झाले.

: पण प्राचीन काळी साऱ्या देशभर एक लिपी होती याचा पुरावा काय ?

: अशोकाने बहुजनसमाजाच्या हितार्थ ठिकठिकाणी स्तंभ व शिलालेख कोरून ठेवले आहेत. दक्षिण भारतातील मस्कीपासून गांधारात शहाबाजगढीपर्यंत व पश्चिमेस गिरनारपासून बंगाल नेपाळच्या तराईपर्यंत ते पसरलेले आहेत. हे काम तक्षशिलेतील लिपीकारास दिले होते. एका शिलालेखात त्याची खरोष्टी लिपीतील 'चपड 'ही सहीदेखील उपलब्ध आहे. सामान्य लोक हे लेख सर्वत्र सहज वाचू शकत असत.

: म्हणजे अशोकाची लिपी हीच भारतीयांची मूळ लिपी म्हटली पाहिजे.

: नाही, ज्याप्रमाणे एका कालखंडात भारतावर पर्शियन संस्कृतीची छाया पडली होती तशीच अशोकपूर्व काळांत पश्चिम-उत्तर संस्कृतीचा प्रभाव होता. मूळ माहेश्वरी लिपी अशोककालात भ्रष्ट झाली होती. तिचा जीर्णोद्धार शुंग व गुप्त काळात झाला व अशोकाची लिपी त्यांत लुप्त झाली.

: हे फार चांगले सांगितले तुम्ही. कारण भारत हे एक राष्ट्रच नाही असे म्हणणाऱ्यांना ही फार मोठी चपराक आहे. त्यांना तर या देशाची बाल्कन राष्ट्रे करावयाची होती.

: हा आपल्या हिंदूंचा दोष आहे. आपण कोणाचेही कौतुकाने स्वागत करतो व हा पाहुणा आपल्या डोक्यावर बसला की आरडा- ओरडी सुरू करतो. प्रथम म्लेंछांचे कौतुक व अंधानुकरण झाले. आपल्या पोशाखावरही त्याचा परिणाम झाला. पुढे ग्रीक (यवन आयोनियन), नंतर मुसलमान व कालपरवा इंग्रज यांचे आपण भाषा, लिपी, कपडे, आचारविचार, कायदा वगैरे बाबतींत आपण गुलाम झालो.

: पण यात आपली मूळ संस्कृती नष्ट झाली का ?

: नाही, वैदिक भाषा व पाणिनीचा वैय्याकरणी प्रभाव एवढा जबरदस्त आहे की परकी भाषांचे आक्रमण आम्ही पचविले. यास मदत केली ती आमच्या नद्या व तीर्थक्षेत्रे यांच्यावरील धार्मिक श्रद्धेने. आमचे धार्मिक बंधन एवढे समर्थ आहे की ते आपणास विभक्त होऊ देत नाही.

: अरबी लिपी, फार्शी लिपी आपल्या सर्व भारतीय लिप्यापेक्षा वेगळ्या का? आपण डावीकडून उजवीकडे लिहितो तर ते उजवीकडून डावीकडे.

: हा भेद वरवरचा आहे. आपली लिपीसुद्धा पूर्वी उजवीकडून डावीकडे लिहिली जात असे.

: याला पुरावा ?

: अशोकाच्याच एका शिलालेखात एक ओळ उजवीकडून डावीकडे, त्याखालची डावीकडून उजवीकडे, पुन: उलट, पुन: सुलट म्हणजे बैल शेत नांगरतो त्या क्रमात कोरली आहे. एरण (मध्य प्रदेश) येथील मुद्रा उलटच कोरलेली आहे. हरप्पा-मोहोंजोदारो-लोथल मुद्रा सर्व उलटचा क्रमाने कोरलेल्या आहेत.

: मोठे मजेदार वाटते सारे. आजवर आम्हास शिकविले होते की हिंदूच्या उलटे करणे इस्लामला मंजूर आहे. त्यांची दाढी तर आमची शेंडी–

: खरे म्हणजे दाढी व जटा आमच्या होत्या. मुसलमानांचे Original असे काहीच नाही. सारे त्यांनी कोणाची न कोणाची नक्कल करून उचलले आहे. पुष्कळदा प्रचलित पद्धती त्यांनी चालू ठेवल्या. त्या पद्धती आपल्याकडे बदलल्या. त्यांच्या जुन्या चालू राहिल्या. म्हणून आपल्याला त्यांचे उलटे वाटते.

: या लिपीच्या बाबतीत तरी ते पटले.

: आणखी एक गंमतीदार पुरावा सांगतो. अंक लिहिण्याची एकम्, दहम्, शतम्...ही पद्धत अजूनही उजवीकडून

डावीकडे लिहिण्याच्या जुन्या पद्धतीचा अवशेष उरला आहे. लिपीत बदल घडले, अंक मात्र बदलले नाहीत. अंकानाम् वामतो गति : हे सूत्र तुम्ही ऐकले असलेच.

: उर्दू किंवा अरबी लिपी देवनागरी लिपीतून जन्मास आली असे काही लोक म्हणतात. त्यात सत्य कितपत आहे ?

: काही वर्षांपूर्वी मिप्ला लॅबोरेटरीचे चीफ केमिस्ट डॉ. महदी हसन यांनीच हा प्रबंध पुण्याच्या ओरिएंटल इन्स्टिट्यूटच्या विशेषांकात लिहून आकृतीच्या आधारे असे दाखविले होते की अ हे अक्षर आरशातून प्रतिबिंबित केले की आरशात अ चे पर्यायी उर्दू वर्ण अलीफ व ऐन हे दिसतात. य अक्षर उलट केले व त्यातील काना काढला की उर्दू ये तयार होते. तीच गोष्ट प, त, ज, र, फ वगैरे वर्णांची !

: बापरे, फॅंटॅस्टिक रिसर्च आहे हा !

: मी महदी हसनना सांगितले की देवनागरीची रूपे उर्दूच्या मूळ वर्णानंतर रूढ झाली, हे ऐतिहासिक सत्य असल्याने तुमचा प्रबंध मनोरंजक वाटला तरी इतिहासाच्या दृष्टीने अशक्य आहे. म्हणून त्यांनी एका बगदादच्या मासिकात (अल् उर्वा) अरबी लिपीचा पर्शियनपर्यंत झालेला विकास दाखविला. त्यात इ. स. १५० चा उमूल जमालचा शिलालेख आद्य अरबी आहे असे प्रतिपादिले आहे. मी त्याची प्रत घेऊन गिरनारच्या ब्राम्ही शिलालेखाशी तुलना केली. मला आश्चर्य वाटले की अरबीच्या २२ वर्णांपैकी १६ वर्ण तंतोतंत अशोकाच्या ब्राह्मीप्रमाणे होते. नंतर अरबस्थानच्या इतिहासाचा मागोवा घेता असे आढळले की दक्षिण अरबस्थानातून अरेमिकवर आधारलेली त्यांची लिपी लोप पावून तिची जागा या निब्बती लिपीने घेतली होती. हा काळ विक्रमादित्याच्या सुमाराचा होता. विक्रमादित्याने अरबस्थानात धर्मप्रसारासाठी जे पंडित धाडले त्यांचा उल्लेख त्यावेळी लिहिलेल्या अरबी काव्यात

---


# एका पराभवाची कहाणी

**ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे**

**मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन**


---

आढळतो. यावर विस्तृत लेख मी १९५० साली युनायटेड आशिया या त्रैमासिकात प्रसिद्ध केला होता.

: दुर्दैवाने या गोष्टी भारतीय तरुणांना माहीत नाहीत.

: भारतीय तरुणच काय, भारतीय पंडितही पाश्चात्यांच्या ओंजळीने पाणी पितात व आपल्या इतिहासातील घटनांची विकृतपणे आपल्या विद्यार्थ्यांना माहिती देतात.

: विकृतपणे म्हणजे ?

: आमचे प्राध्यापक १८९० पूर्वीचे वेबर, मॅक्समुल्लर, व्यूह्लर वगैरे quote करीत असतात. गेल्या ५०।६० वर्षांत एवढी नवीन माहिती उपलब्ध झाली आहे की मॅक्समुल्लर, वेबर वगैरे मंडळी आता Obsolete ठरावीत. मॅक्समुल्लरने ऋग्वेदकाल इ. स. पू. १२०० अंदाजाने ठरविला होता. सर्व इतिहासकार तो (मुजुमदारांपासून डॉ. सांकळीयापर्यंत) प्रमाण मानतात. वस्तुतः ऋग्वेदकाली सरस्वती नदी धो धो वाहत होती. वेदकाल ठरविण्यासाठी ही नदी लुप्त केव्हा झाली ते ठरविणे आवश्यक आहे. हे Geologists चे काम आहे. कराचीचा समुद्रतट इ. स. च्या ३००० वर्षांपूर्वी वर येऊ लागला. ही घटना बोलकी आहे.

: वेदकाली लेखनविद्या नव्हती असे मॅक्समुल्लर प्रभृती पंडित ठासून सांगतात. त्यावर तुमचे काय मत आहे ?

: माझे स्पष्ट मत आहे की या पंडितांनी मुळातून वेद वाचलेच नाहीत. They depended on translators. यजुर्वेदात इष्टिकांवर एक सबंध सूत्रच आहे. या इष्टिका म्हणजे मोहोंजोदारो किंवा लोथल येथे सापडतात त्या विटा! या विटांवर सर्व मंत्र लिहिलेले असत. अथर्ववेदात असे लिखितवेद पेटीतून काढतात व परत आत ठेवतात असे वर्णन आहे.

: पण ह्या युरोपियन पंडितांनी असे का म्हणावे ?

: भारतीय संस्कृतीची प्राचीनता नाकारणे हा तर मिशनरी पंडितांचा आग्रह होता. वेदांचे भाषांतर वाचून आपले पूर्वज किती अडाणी होते हे समजून हिंदूंनी ख्रिस्ताकडे वळावे हा इरादा मॅक्समुल्लरने आपल्या पत्नीस लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केला आहे.

: मग आपल्या लिपीचा विकास कोणत्या क्रमाने झाला ?

: प्राचीन व्याकरणात म्हटले आहे की, नटराज शिवाने डमरूचे बोल काढून त्यातून ध्वनिवर्णविवेचक माहेश्वरी सूत्रे सनकादी सिद्धांना दिलीः पुढे गणेशाने त्यातील तर्कसंगतीप्रमाणे आकृत्या तयार करून माहेश्वरी ब्राह्मी लिपी सिद्ध केली. 'इदं गणेशकीलकम् कथितं ते प्रजापते शिवप्रोक्तंतु मंत्राणाम् उत्कीलन करं परम् ।' म्हणजे, पूर्वी शिवाने जे मंत्र सांगितले ते गणेशाने कोरले. म्हणून गणेश हा लिपीचा आद्यप्रवर्तक असून त्या परंपरेतील एका गणेशाला व्यासासाठी महाभारत लिहून द्यावे लागले, ही गोष्ट सुत्रसिद्ध आहे.

: पुढे विकास कसा झाला ?

: गणपती अथर्वशीर्षात गणेशाचा बीजमंत्र ' गँ ' कसा लिहावा याचे स्पष्ट वर्णन आहे. लिपी ही ' अर्धेन्दुलसितम् ' म्हणजे चंद्रकोरींनी युक्त असावी असे म्हटले आहे. महाभारतकाली गीतेत ' अक्षराणां आकारो ऽस्मि ' असे वचन येते. चंद्रकोरींवरोबर आकारदेखील स्पष्ट दिसावा असा विचार लेखकवर्गा-पुढे प्रामुख्याने येऊन भारती अथवा नागरी लिपीचा विकास होऊ लागला. पद्मपुराणात अआ-इ-ई–उ-ऊ आदी अक्षरांचे प्रत्यक्ष वर्णनच केले आहे. ' भारती लिप्यैव लिखितं पुराणंतु प्रशस्यते, ' असे स्पष्टपणे म्हटले असून देवलिपीत शिरोरेखा असावी असा नियम सांगितला आहे. तो श्लोक असा : ' सर्वाक्षरे शिरोरेखा अवक्रा प्रणवं विना ॥ ' म्हणजे ओंकाराशिवाय सर्व अक्षरावर शिरोरेखा पाहिजे. देवनागरी व इतर लिप्यातील हा मुख्य फरक आहे.

: आय सी, हिंदू लोक पत्राच्या किंवा कोणत्याही लेखनाच्या प्रारंभी ' श्रीगणेशाय नमः ' का लिहितात ते माझ्या ध्यानी आले.

: एक लक्षात ठेवा, हिंदू लोकांचे हे वैशिष्ट्यच आहे. स्वतःकडे मोठेपणा न घेता ते श्रेय देवाकडे द्यायचा त्यांच्या मनाचा मोठेपणा मला वाटतो. जगात यास तोड नाही. म्हणून हिंदूंची शास्त्रे (Sciences) शिकावयाची असतील तर आधी- धर्मशास्त्र जाणून घ्यावे लागते.

: हे अगदी खरे आहे. जो हे जाणत नाही तो या देशाच्या राजकारणात वा समाजकारणात अयशस्वी ठरतो. टिळक वा गांधीजींचे उत्तम उदाहरण आहे. त्या मानाने सावरकर व नेहरू यशस्वी ठरले नाहीत.

: और नॅशनल सायकॉलॉजी आहे आपली !

: अगदी खरे !

● ● ●

## पैंज : एक लावणं नि जिकणं

प. जर्मनीतला ' अल्फॉन्स कोएस्टर ' हा एक ७३ वर्षांचा वृद्ध खाणावळ-मालक. मोठा गमत्या, विनोदी. चम-त्कारिक नि वरवर महामूर्खपणाच्या वाटणाऱ्या पैंजा मारून त्या विलक्षण बुद्धिसामर्थ्यानं जिकण्याबद्दल प्रसिद्ध. त्यानं एक पैंज मारली. ' खाणावळी-तल्या धुरांड्यासारखी उंच टोपी घालू-नही मी राष्ट्राध्यक्ष हानेमान यांना भेटू शकतो... ' पैंज होती दोन हजार जर्मन मार्कांची. सहा हजार रुपयांची. ठरलं. हरला तर त्यानं सहा हजार रुपये द्यायचे. जिकल्यास ते त्याला मिळायचे.

कोएस्टरनं पैंज जिकली. जिकलेल्या पैंजेची सर्व रक्कम कोएस्टर मानसिक वाढ खुंटलेल्या मुलांची काळजी वाहा-णाऱ्या एका चॅरिटेबल संस्थेला दान करणार आहे.

**–चित्तरंजन घोटीकर**

# मानवत

पृष्ठ ३ वरून

गावातला असला पाहिजे. प्रेत ठेवण्याच्या प्रकारावरून एकापेक्षा जास्त माणसे खुनाच्या वेळी हजर असली पाहिजेत.

खुनाच्या जागेजवळच्या विहिरीपर्यंत आणि आंबेगावच्या वेशीअलीकडील मोठ्या झाडापर्यंत कुत्र्यांनी पोलिसांना नेऊन सोडले होते. कुत्र्यांना खुनाच्या जागेवरील पावलांचा वास देण्यात आला होता.

तरीही अजूनपर्यंत पोलिसांना कोणी सापडलेले नाही.

एक किस्सा : एका पोलिसाने सांगितलेला.

तपास चालू होता. एक विशिष्ट शेत कोणाचे हा तपास चालू होता. एकाला विचारले की, 'हे शेत कोणाचे.' 'काय की बाबा. मला न्हाई माहीत' म्हणून तो माणूस निघून गेला. जवळच रेंगाळणाऱ्या एका पोराला विचारले. पोरगे बोलेच ना. खडसावल्यावर हळूच म्हणाले—'त्यो गेला ना त्याचंच.' 'मग आताच त्याला इच्यारलं की, न्हाई म्हणला की'— पोलीस. पोरगे—'न्हाई साहेब, त्याचंच सेत हाय. माली बराबर म्हाईत हाये.' पोलिसाने त्या माणसाला पुन्हा बोलावले. दम देऊन विचारल्यावर कबूल झाला.

असे सर्वत्र गौडबंगाल आहे. लोक बोलत नाहीत.

हलीमाच्या आधी एका १४।१५ वर्षे वयाच्या एका वेश्येला पळवून नेण्याचा प्रयत्न झाला. हलीमाच्या ऐवजी तिचाच नंबर खरे पहाता लागायचा. पण नशिबाने वाचली. तिला भेटलो. तीही बोलायला तयार नाही. पळवून न्यायला आलेली माणसे गुन्हेगार जगताशी संबंधित होती. 'मला माहीत नाही.' हे एकच पालुपद त्या मुलीने शेवटपर्यंत चालवले. का ?

मानवतच्या प्रत्येक फेरीत माझा पाठलाग काहीजण सतत करताना मला आढळायचे. पार्वतीबाईच्या खुनाच्या जागेपाशीच मी बसलो होतो. त्यावेळी पाठलाग करणाऱ्यांपैकी १।२ जण मला आढळून आले. तपास करणाऱ्या एका अधिकाऱ्याशी त्यांची बरीच गट्टी असावी असे वाटले. ते लोक पोलिसांचे नाहीत हे मला माहीत आहे आणि तेच लोक कोणाशी संबंधित आहेत हेही मला पक्के माहीत आहे.

पोलीस अधिकाऱ्यांना मी एक प्रश्न विचारला होता. बन्सी वाळकेने काही लोकांची नावे सांगितली आहेत, आणि त्या नावात काही प्रतिष्ठितांची नावे आहेत. हे खरे काय ? त्यापायीच तपासाचे गाडे अडकले आहे हे खरे काय ? असा प्रश्न होता. कृपा करून मला त्या बाबतीत काही विचारू नका, असे उत्तर त्या उच्च पोलीस अधिकाऱ्याने दिले होते.

बन्सी वाळके खुनी नसला तरी

खुनाशी संबंधित आहे एवढे सिद्ध होण्यासारखा पुरावा पोलिसांना सापडला आहे.

बन्सी वाळकेला सोडून द्या अशी रदबदली मानवतच्या एका प्रतिष्ठित पुढाऱ्याने केल्याचेही माझ्या कानावर आले आहे.

तपास जारी असतानाची आणखी एक हकीकत. पार्वतीबाईच्या शरीरावर काळे डाग आढळून आले. डॉक्टरांनी ते डाग ' सनबर्न 'चे डाग असल्याचा निर्वाळा दिला. पण तीन पोलीस अधिकारी भेटले ज्यांनी तो भानामतीचा प्रकार असल्याचे ठामपणे सांगितले. हा प्रकार अजबच म्हटला पाहिजे.

आता मालिका पूर्ण झाली आहे. तरीही मानवतमध्ये दहशत आहेच. पुरावे नाहीत ही सबब खरी धरली तरी संशयितांना जरब बसवण्यासाठी काही उपाय योजना करता येईल. उदा. तपासासाठी आलेले पोलीस एखाद्यावर आळ घालून पैसे उकळण्याचा धंदा करीत आहेत. एका पोलीसाने दारू पिऊन एका प्रतिष्ठित महिलेवर बलात्कार केल्याचेही ऐकिवात आहे. अशा अनेक गमती जमती पोलीस करीत असताना पोलिसांवर लोक कसा विश्वास ठेवणार ?

खून सत्रात पोलीस अधिकाऱ्यांचा हात तरी असावा किंवा त्याचा काणाडोळा तरी असावा असे लोक बोलतात. परांजेंची हालचाल व अन्य काही पोलीस अधिकाऱ्यांची हालचाल संशयास्पद वाटते. पवारांनी काही करता आल्यास पहावे. अर्थात आता काही उपयोग होईलसे दिसत नाही.

मानवत गावाचा इतिहासच गोंधळाचा आहे. काळ्याबाजाराचा हा मोठा अड्डा आहे. काळाबाजार करणारे मातबर व्यापारी या गावात आहेत. काळ्या व्यापारात नफा मिळवण्यावाचून अन्य धंदा त्यांना माहीत नाही. काँग्रेसचे समाजवादी पुढारी इथून निवडून येतात-ते या काळ्याबाजारवाल्यांच्या सहकार्यानेच. इथले शासनाचे प्रतिनिधीही अतिशय भ्रष्ट.

जनताही मोठी मजेशीर. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी सेलूच्या राष्ट्रीय शाळेला मदत म्हणून एक नाटकाचा प्रयोग इथे लावण्यात आला होता. एक पैशाचीही मदत त्या काळी झाली नाही. सत्ताधाऱ्यांची शय्यासोबत करण्याचा इतिहास या गावात फार जुन्या काळापासून आजतागायत चालत आला आहे.

या सर्वांचा परिणाम म्हणून गावातले कोणीच गरिबाच्या मदतीला जायला तयार नाही. प्रत्येक जण आपल्या पैशाच्या मस्तीत मश्गूल आहे.
¤

आता ७ खून संपले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे यापुढे स्त्रीचा खून पडण्याची आवश्यकता नाही.

आता कदाचित नंबर लागेल बन्सी वाळकेचा. किंवा त्याच्याच सारख्या कोण्या माणसाचा, ज्याने पोलिसांना माहिती दिलेली आहे.
¤

केसरीतल्या बातमीप्रमाणे 'मला मानवत प्रकरणी तोंड दाखवायला जागा नाही. माझ्या खात्यासाठी अनुदान मी कसे मागू?' असे उद्गार शरद पवारांनी काढल्याचे पहिल्या पानावर प्रसिद्ध झाले आहे.

विधानसभेतल्या चर्चेमध्ये त्यांनी एक खुलासा केला आहे. वर्तमानपत्रातून तो ठळकपणे प्रसिद्ध झाला आहे. तो असा की, ७ जणांच्या टोळीचा सुगावा लागला आहे. पण आताच त्या लोकांची नावे जाहीर करणे हिताचे होणार नाही वगैरे वगैरे.

बन्सी वाळकेने अनेक जणांची नावे सांगितली आहेत; इतर अन्य मार्गांनी पोलिसांना नावे कळली आहेत. याला महिना होऊन गेला आहे. त्यात नवीन काहीच नाही. टोळी आहे हेही सिद्ध झाले आहे, पोलिसांना मान्यही करावे लागले आहे.

मग एकदम घोषणा करण्यासारखे त्यात काय आहे? खूप पूर्वीपासून नावाचा सुगावा लागला असूनही शरद पवारांचे सरकार त्यांना पकडू शकत नाही यातच खरी ग्यानबाची मेख आहे.

आपण त्यांना पकडू शकत नाही आणि पुढले काही दिवस पकडू शकणार नाही हे सत्य पवारांनी विधान संकेत आडवळणांनी सांगितले आहे.

ही फसवाफसवी आहे. नाकर्तेपणा आहे.

● ● ●

---

## बर्लिनला का जावसं वाटतं ?

लंडनमध्ये नुकतीच एक स्पर्धा पार पडली. विषय दिला होता, 'मला बर्लिनला जावस का वाटतं?' लेखी उत्तर फक्त पंधरा शब्दांच्या आतच द्यायचं होतं.

स्पर्धा जाहीर होती. किती प्रवेशिका याव्यात ?

चार हजार उत्तरं आली होती. म्हणजे चार हजार जणांनी भाग घेतला होता, असा सरळ अर्थ.

उत्तरं बुद्धिवादी, तशीच गमतीची, विनोदीही होती.

एकानं लिहिलं होतं, 'गेल्या खेपेस मी बर्लिनला गेलो असताना माझी हॅट तिथे विसरली होती. ती आणण्यास...'

एका तरुणानं लिहिलं होतं. 'मला जर्मन चिक्स (कोंबडीचं पिल्लू) फार आवडतात. म्हणून बर्लिनला जावसं वाटतं...'

तथापि, पश्चिम जर्मनीच्या लंडनमधील अँबॅसडरनं – कार्ल गुंथर फॉन् हेस् यानं – एका बाईचं उत्तर बक्षिसपात्र ठरवलं. त्या बाईनं लिहिलं होतं, 'माझ्या म्हाताऱ्या नवऱ्याला मला बर्लिन भिंतीवरून पलीकडे (पूर्व जर्मनीत) फेकून द्यायचं आहे, म्हणून मला बर्लिनला...' इ. इ. इ.

◻

# बारा जीवांची हत्या !

**[ गेल्या सप्टेंबर महिन्यात ११ ते २० तारखांच्या दरम्यान एकूण १२ जीव कोळेगावात दगावले. त्याची ही हकीकत. एका शिक्षकाने कळवलेली. डॉ. बाबा आढाव यांनी माणूसकडे आणून दिलेली. शिक्षकाचे नाव आहे– उपासराव हन्सुजी नारनवरे. ]**

कोळेगाव जाफ्राबाद तालुक्यात असून औरंगाबाद जिल्ह्यात आहे. येथे पहिली गुलामगिरी निझाम राज्याची होती. त्या पेक्षाही हल्ली गुलामगिरी ज्यास्त आहे.

गावात पिण्याच्या पाण्याची विहीर १९६० साली बांधली आहे. त्या विहिरी-वर सर्व बौद्ध लोक पाणी भरत व सुवर्ण मराठ्याच्या बाया धुणे धुत. ते शेत रामराव पाटलाने पाच वर्षापासून घेतले आणि गव्हाचे पीक काढण्या-करिता पहिल्या वर्षी त्या विहिरीतून मोटेने पाणी काढून शेतीला दिले. आता चार वर्षापासून इंजिनने पाणी देत होता. विहिरीच्या काठी पाच फूट खोलीचा खड्डा करून त्यात इंजिन बसवून विहिरीला दोन भोके पाडून पंप टाकला जात होता. ह्यावर्षी गव्हाचे पीक घेण्याकरिता पाटलाने इंजिन विहिरीत टाकले. ह्यावर्षी पावसाला लौकर सुरुवात झाली आणि गावातील मळमुत्राचे पाणी सर्व विहिरीत गेले. विहीर दूषित झाली. त्या अगोदर बौद्ध लोकांनी शिकायत केली. सरपंचा-जवळ. पाणी गढूळ झाले विहिरीची भोके बुजवा म्हणून. पाटलाने दुर्लक्ष केले. गढूळ पाणी झाले तेव्हा बौद्ध लोक सुर्वणाच्या विहिरीवर पाणी मागण्या-करिता आले. आठ दिवस पाणी दिले. नंतर सुवर्ण म्हणाले तुमच्या विहिरीचे पाणी नितळ झाले. आम्ही कोठपर्यंत पाणी काढून द्यावे ? तेव्हा सर्व बौद्ध पूर्वीच्या विहिरीवर गेले. थोड्याच दिवसात चंद्रकला विठोबा हिला सकाळी हाग ओक झाली. तिला चिखलीच्या दवाखान्यात नेण्यास ८ वाजता घरातून काढले. चार मैल पुढे जात नाहीतर तिचा अंत झाला. त्याबद्दल कोणीही चौकशी केली नाही. त्यानंतर हरीबा काळू याची १६–९–७३ ला संध्याकाळी ८ वाजेपासून चार मुले हाग ओकीने पडले. तसेच दुसरे दोन पंचफुला संपत

व गौतम पांडू. त्यात सरपंच व पोलीस पाटील यानी काय झाले तेसुद्धा जावून पाहिले नाही. मी हरीबाच्या घरी जावून मुलाची स्थिती पाहिली आणि कॉलरा आहे असे सांगितले. त्यावर जीवण मिक्चर औषध दिले. त्याच रात्री १७ ला सकाळी चार दगावले. जवळ जवळ सात ते आठ चिखलीला त्याच दिवशी गेले. दुपारी दोन दगावले. वंडू लिंबाजी व मुस्तीदा हरीबा. डॉक्टर जाफ्राबादचे व बी. डी. ओ. साहेब आले. डॉक्टरांनी दहा बारा लागण झालेल्या लोकांना औषधोपचार केला. नंतर रात्री दहाला दारू पिऊन सोबतचे अधिकारी व डॉक्टर दोघेही ऑफिसच्या पुढे झोपले. लागण झालेले लोक रात्रभर तडफडत होते. डॉक्टर उठले नाहीत आणि आजारी लोकांना त्यांनी पाहिले नाही. पांडू येडू ज्यास्त झाला. रात्री दोडला त्याची बायको अनसाबाई केविलवाणी होऊन म्हणाली, ' डॉक्टर साहेब, माझा नवरा कसा करतो, त्याला काही तरी द्या हो ! डॉक्टर म्हणाले, 'तुला ज्यास्त माझ्यापेक्षा समजते का ! ' काही वेळाने पांडू येडूचा अंत झाला. घरी गजाबाई होती तीसुद्धा दगावली. विमल विठोबा हिला बैल गाडीने चिखलीला नेत असता रस्त्यातच तिचा अंत झाला.

दुसऱ्या दिवशी टेंभुर्णीचे डॉक्टर आले. त्यांचा स्टाफसुद्धा होता. त्यावेळी पाच लागण झालेले लोक होते. त्यांना चिखलीला नेणे आवश्यक होते. त्याप्रमाणे घेऊन गेले. माझ्याजवळ काही औषध दिले आणि सांगितले, कोणी लागण झाला तर त्याला औषध द्यावे. प्रमाण सांगून ठेवले. ते रात्री अकराला परत आले. पुनः चार लोक लागण झाले.

दि. १८ च्या रात्रीच डॉक्टरांनी सांगितले. माझ्या गाडीत पेट्रोल कमी आहे आणि माझ्याजवळ पैसे नाहीत. सध्या तुम्ही पैसे द्या. सरपंच व पो. पाटील यांना मागितले. त्यांनी नकार दिला. मला विनंती केली असता मी १८ रुपये


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत . सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

दिले. चार आजारी घेऊन त्यांना चिखलीला नेले. त्यानंतर पुनः परत आले. पुनः सकाळी १९ ला पाच सहा लागण झालेले लोक नेले. बुद्धवाड्यात तरुण माणूस राहिला नाही.

लोक घाबरले. २०–९ ला, बि. डी. ओ साहेब, मे. तहशिलदार साहेब आले. लोकांनी विहिरीची शिकाप केली. माझ्यावर दडपण टाकले गेले. यात भाग घेऊन तुम्हाला काय करायचे, डॉक्टरांना कशाला मदत करता, आजारी लोकांना कशाला मदत करता? याद राखा. मी घरी गेलो. पुनः बौद्ध लोक माझ्याकडे आले आणि म्हणाले, तुम्ही आमच्याकरिता झटता तर तुमच्यावर तुमचे लोक चढतात.

त्याच संध्याकाळी माझे वरिष्ठ म्हणाले, तुम्ही माझ्या ड्युटीत आहात. काल साहेबाने तुम्हाला सांगितले. कोणाच्या घरी जावून ये. रात्री सहाची वेळ होती. मी वर तुमची कार्यवाही करतो, अशी मला धमकी दिली.

पुन्हा मी बौद्ध वाड्यात गेलो. त्या दिवशी आनंदा संतु हाग ओकीन पडला. त्याला गोळ्या व औषध दिले आणि चिखलीला घेऊन जाण्यास सांगितले. पाटील सरपंच व देवीचे भक्त श्री. भगवात गोपाळा, संपत देवराव सखाराम म्हातारजी, नामदे, यांनी गावात दंढोरा दिला–आपल्या गावात देवी निघणार आहे अशा वेळी.

१. कोणीही घराच्या बाहेर पडू नका.

२. गाडीचे चाक फिरवू नका.

३. चटणी मसाला वाटू नका.

४. केस विंचरू नका.

५. दळण दळू नका.

६. दाथोन लावू नका.

७. फोडणी देऊ नका.

तरीही हरिवाला सांगितले, आनंदाला घेऊन जावे नाही. पाटील मारल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा देवीच्या भक्ताने भगवान गोपाळाने सांगितले, वरुडवरून गाडी आणा. त्याप्रमाणे दोघे वरुडला गाडी आणण्याकरिता गेले. चार कि. मीटर अंतर जाता येता विलंब लागला. देवीने लिंबे व पाणी पायाचे तीर्थ म्हणून आनंदाला पाजले आणि आशीर्वाद दिला, आता बरा होईल. दुसऱ्या गावावरून गाडी येण्यास विलंब लागला. त्यामुळे आनंदा विना औषधोपचाराने गावाच्या बाहेरच मेला. नंतर डॉ. लोकांचे पथक आले आणि औषधोपचारास येथे सुरुवात झाली. १२ लोक मरेपर्यंत मात्र पथक आले नाही. सुवर्ण लोकांच्या विहिरीवर १७ तारखेपासून आम्ही पाणी मागत होतो. आता १।१० पासून आम्ही फौजदारसाहेबाच्या आदेशावरून पाणी भरत आहोत. ही घटना १०।९।७३ ते २० पर्यंत घडलेली.

● ● ○

# इंदिराजींच्या पावलावर

पृष्ठ ८ वरून

वाचवा तर आम्ही पेट्रोल वाचवणारच. त्यात बिलकूल हयगय होणार नाही. इतके दिवस आम्ही म्युनिसिपालिटीची मोटार घेऊन गावोगाव हिंडत होतो. गावातही म्युनिसिपालिटीत जाण्यासाठी मोटार वापरीत होतो. आता मोटार बंद. यापुढे आम्ही घोड्यावर बसून म्युनिसिपालिटीत जाऊ. त्यासाठी एक अरबी घोडा पाहिजे. त्याची ऑर्डर दिलीच आहे. आता या पुढच्या बजेट-मध्ये घोड्याची कायमची तरतूद करून टाकू. उपाध्यक्षासाठी एक शिगरूही सांगून ठेवले आहे. घोड्याची देखरेख करण्यासाठी एक मोतद्दार, तबेल्याचे भाडे आणि घोड्याच्या रोजच्या चंदी-साठी हरभरा, गवत इ. मिळून वर्षाला आम्ही पंचवीस हजार रुपयाचा खर्च धरला आहे. मात्र, घोडा आजारी पडल्यास ऐनवेळी धावपळ होऊ नये म्हणून म्युनिसिपालिटीची मोटार पण सज्ज ठेवणार आहोतच. त्यासाठी मोटारीचा खर्च आणि ड्रायव्हरचा खर्च याची पण व्यवस्था बजेटमध्ये करणार आहोत. मात्र पेट्रोल फार थोडे वापर-णार आहोत हे तुम्हाला आधीच सांगून ठेवतो. कितीही पैसे खर्च झाले तरी चालतील, पण पेट्रोलचे बिल मात्र जास्त होऊ नये अशी काळजी आम्ही घेणार आहोत.' ◻

प्रेसिडेंट धसमुसळे यांनी जो विचा बोलून दाखविला तो आम्ही गावातील काँग्रेसपुढारी देशभक्त अण्णासाहेब हंडीबागकर यांना सांगितला तेव्हा ते म्हणाले,

'आम्ही तर यापूर्वीच आमचे वाहन बदलले आहे. परवापर्यंत आम्ही काँग्रेस कमिटीच्या जीपनं खेडोपाडी प्रचाराला जात होतो. ही जीप परवाच आम्ही विकून टाकली. काटकसरीच्या दृष्टीने आता प्रत्येक कार्यकर्त्याला स्वतंत्र स्कूटर असावी असे आम्ही ठरवले आहे. स्कूटरला पेट्रोल फार थोडे लागते हे तुम्हाला ठाऊकच आहे. आम्ही दह स्कूटर्स नव्याकोऱ्या 'ऑन' देऊन तातडीने खरेदी केल्यासुद्धा. त्यांचा उपयोगही कार्यकर्ते करीत आहेत. प्रत्येक स्कूटरचे पेट्रोलचे बिल एका वेळेला जीपइतके कधीही येणार नाही अशी दक्षता घेतली जाईल.'

'पण निवडणुकीच्या वेळी काय करणार तुम्ही?' मी जिज्ञासेने विचा-रले. 'त्यावेळी तुम्हाला याची गरज लागणारच. आता विधान-सभेच्या पोट-निवडणुकी आहेत. नगरपालिकेच्या तर गावोगाव आहेत. जीप पळवली नाही म्हणजे निवडणूक झाल्यासारखी तुम्हाला वाटणारच नाही आणि जनतेलाही ते पटणार नाही.'

देशभक्त अण्णासाहेब माझ्या या प्रश्नामुळे थोडे विचारात पडल्यासारखे दिसले. थोडावेळ डोके खाजवून ते म्हणाले,

'तुम्ही म्हणता ते अगदी खरे आहे.

निवडणुकीच्या वेळी जिप हिंडली नाही तर निवडणुकीचे वातावरण निर्माणच होणार नाही. त्यासाठी आम्ही असे करू —

'कसं ?'

एका गावाहून दुसऱ्या गावाला जायला फक्त जीपचा उपयोग करू. गावात शिरल्यावर मात्र जीपला बैलगाडी जोडू आणि जीप ओढायला सांगू. आता जीपमध्ये जितके पुढारी तितक्या बैलगाड्या जास्त लागतील हे खरे आहे. पण पेट्रोल वाचेल. शिवाय मिरवणूक निघाल्यासारखी दिसून आपोआप प्रचार होईल.'

'तुमची ही कल्पना फारच उत्कृष्ट आहे. पण मारामारीचे कसे करणार ?

'कसली मारामारी ?'

'निवडणुकीच्या सभेत दंगाधोपा, मारामारी करण्यासाठी चारदोन ट्रक भरून माणसे न्यावी लागतात. त्याचे कसे करणार ? ट्रकला पेट्रोल तर लागणारच.'

'ही एक अडचण आहे खरी. पण काटकसर केलीच पाहिजे. पूर्वी आम्ही चार ट्रक भरून माणसे नेत होतो. आता तीन ट्रकच नेऊ. थोड्या मारामाऱ्या कमी होतील. पण त्याला काही इलाज नाही. सध्याची विकट परिस्थिती लक्षात घेऊन जनतेने आम्हाला क्षमा केली पाहिजे. एकदा ही टंचाई संपली की पुनः अशी ही गैरसोय दूर करू.'
□

त्यानंतर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बाळोबा डोईफोडे हे मोटारीत हिंडताना मला एकदम रस्त्यावर भेटले. पेट्रोल टंचाईचा विषय काढल्यावर ते मान हलवून बोलले,

'आमच्या जिल्हा परिषदेत पन पेट्रोल-टंचाई थोडी करावी म्हंतो. आमच्याकडं पाचपन्नास पैलवान हायेतच. निस्ते पडूनच आसत्यात एरवीच्या टायमाला. जिल्हा परिषदेची मीटिंग भरली म्हंजे समद्या सभासदांना खांद्यावर घालून उचलून अनायचे. सभा संपली की पुन्हा खांद्यावर बसवून घरी पोचते करायचे. का, कशी हाये आयडिया ?'

'आयडिया उत्तम आहे.' मी म्हटले. 'पण तुम्ही स्वतः मात्र मोटारीतून हिंडता हे लोकांच्या डोळ्यावर येईल. तुम्ही का नाही मोटारीतून हिंडणं बंद करीत असे लोक विचारायला लागतील. त्यांना काय सांगणार तुम्ही ?'

'धोत् त्येच्या लोकांच्या —' बाळोबांनी खरोखरीच पानाची एक पिंक सराईतपणे रस्त्यावर टाकली. सावधगिरी म्हणून मी जरा बाजूला झालो. तरी एक लहानसा फवारा माझ्या खादी सदऱ्यावर उडालाच.

'जे ते अमच्या मोटरीकडं बगतय. आधी रेल्वेगाडीकडं बगा म्हणावं. रेल्वेचं पेट्रोल आधी कमी करा की. गाड्या कमी सोडा. डब्यात मानसे कमी करा. तिकडं कुनी बगत न्हाई आन् आमच्यावर का धाड ?'

बाळोबा डोईफोडे यांचे हे मार्मिक निरीक्षण पाहिल्यावर मला अधिक बोलण्याची हिंमत उरलीच नाही. मी

ताबडतोब त्यांचा निरोप घेऊन तिथून पळ काढला.

□

सारांश काय, पेट्रोल टंचाईवर उपाय म्हणून इंदिराजींनी जो मार्ग दाखला त्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. नवीनवीं उपाययोजना चालू आहे. आता उत्तर प्रदेशात, ओरीसात लवकरच सार्वत्रिक निवडणुकी होणार आहेत. त्या ठिकाणीही या गोष्टी करून पाहिल्या पाहिजेत. शेळचामेंढचासारख्या जनतेसमोर भाषणे करण्यासाठी उत्तर प्रदेशात मंत्री, पुढारी उंटावरून आले तर ते किती छान होईल ! त्यांच्यापेक्षा लहान पुढारी तट्टावर बसून गेले आणि साधे कार्यकर्ते जर गाढवावर बसून गावोगाव प्रचार करीत हिंडू लागले तर मतदारावर केवढा जबरदस्त परिणाम होईल ? आजच्या भीषण परिस्थितीची राज्यकर्त्यांना पूर्ण कल्पना आहे असे मतदारांना वाटेल आणि मतांचे भरघोस माप राजकर्त्यांच्या हातात अगदी अलगद येऊन पडेल, असे तुम्हाला वाटत नाही काय ?

● ● ●

---

## दंतवैद्यांच्या तोंडाला दुर्गंधी ?

'अमेरीकन डेंटिस्टस् असोसिएशन काँग्रेस'च्या अधिवेशनाला जमलेल्या प्रतिनिधींनी आपल्याच दातांची तपासणी करण्याचा उपक्रम केला. काय निष्पन्न व्हावे ? ऐकाच ! 'Zahnaerztliche Praxis' या म्युनिकहून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकाच्या एका अंकात या तपासणीचा निष्कर्ष प्रसिद्ध करण्यात आला. पंचाण्णव टक्के दंतवैद्य—प्रतिनिधींचे स्वतःचेच दात किडलेले आढळून आले...साठ टक्के दंतवैद्य दंतक्षयाने पछाडलेले होते. पस्तीस टक्के दंतवैद्यांना हिरड्यांचे रोग झालेले आढळून आले...पायोरिया, इत्यादी इत्यादी.

आता बोला !

'Physicians, heal thyselves' च्या चालीवर म्हणा, 'Oh Dentists, first take care of the own teeth and gums !'

—चित्तरंजन घोटीकर

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

महाराष्ट्र राज्य
नाट्य-महोत्सव
पुणे केंद्र
सविस्तर परीक्षण
माणूस
पुढील अंकी